श्री

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



फेब्रुवारी — १९८७

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान.
शिरडीचे अधिकृत मासिक


संपादक

**श्री. रा. द. बन्ने**

कार्यकारी अधिकारी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

**प्रा. सौ. इंदिरा खेर**
एम.ए. पी.एच.डी.
(इंग्रजी आवृत्ती)

**श्री. सदानंद चेंदवणकर**
(मराठी आवृत्ती)

---

**वर्ष ६५ वे ]** **किंमत १ रुपया** **[अंक ११ वा**

**दूरध्वनी : ४१२ २५ ६१**

---

: कार्यालय :

**''साईनिकेतन'', प्लॉट नं ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई- ४०० ०१४.**

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख. सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.

**श्री साईबाबांच्या संदेशाचा जगभर प्रसार करणे हे**
**श्री साईलीलाचे मुख्य उद्दिष्ट आहे.**



## रघुनाथ सावित्री साईनाथ भजनमाला

१

नमितों मी आधीं श्री मंगलमूर्ति।
विश्वामध्यें कीर्ति थोर गाजे।।

पूजे अग्रमान असे तुला देवा।
माझी अल्प सेवा स्वीकारावी।।

चौदाही विद्यांचे उदरी भांडार।
कला सर्व थोर तुझे अंगी।।

अष्ट सिद्धी तुझ्या हुजुरांत दासी।
दासा या कृपेसी करीं पात्र।।

२

नमन करितें शारदें तुला माते।
साह्य करिं गे गुरुनाम गावयातें।।

स्फूर्ति देवोनी वदविं मला देवी।
दासि प्रार्थुनियां चरणिं भाळ ठेवी।।

## सुविचार

सगुणोपासनं भक्त्या
रामनाम जपः सदा।।
अन्नदानं यथाशक्ति
त्रयमेतच्च पुण्यदं।।

★★

भक्तीने सगुण उपासना करणे, सदोदित रामनामाचा जप करणे आणि यथाशक्ती अन्नदान करणे या तीन गोष्टी मोठ्या पुण्यदायक आहेत.

★★★

*अनाश्रितः कर्मफलं कार्यं कर्म करोति यः।*
*स संन्यासी च योगी च न निरग्निर्न चक्रियः॥ १॥*
श्रीमद्‌भगवद्‌गीता, अध्याय ६ वा)

या मासिकात प्रकाशित झालेल्या सर्व मजकूराशी संपादक सहमत आहेतच असे नाही.

# श्री साई काव्यबहार विशेषांक — १९८७


## अनुक्रमणिका


| क्रमांक | कवितेचे शिर्षक | कवि-कवियत्रीचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | संपादकीय | — | ६ |
| २ | 'साई-साई'मंत्र घोष हा करील मार्ग मोकळा | — डॉ. रा.सी. कापडी | ७ |
| ३ | माझी आई माझी साई | — डॉ. प्रफुल्ल बाबरे | ८ |
| ४ | संतांच्या विभुती जगी का अवतरती? | — श्री. मधुकर अंबाडे | ९ |
| ५ | साई धाव घे माझे आई | — सौ. अलका जवळकर | १० |
| ६ | रथ चालना चालना शिरडी गावले | — श्री. रमेश चव्हाण | ११ |
| ७ | माझी आई माझा साई | — सौ. मीनाक्षी नाईक | १२ |
| ८ | साईचा दरबार | — श्री. दत्तात्रय मोरे | १३ |
| ९ | आरती साईबाबांची | — सौ. नीता जाधव | १४ |
| १० | श्री नाथांचे चरण धरू | — श्री. मधुकर विचारे | १५ |
| ११ | साई म्हणे, तो भक्त आवडे मज | — श्री. शंकर चौबळ | १६ |
| १२ | स्वप्न | — श्री. भास्कर जोशी | १७ |
| १३ | जय श्री साईबाबा | — श्री. प्रदिप कोरगावकर | १८ |
| १४ | श्री साईलीला | — श्री. हसमुख पाटील | १९ |
| १५ | साई तुझे पाय, लाख मोलाचा ठेवा! | — सौ. संगीता गोडबोले | २० |
| १६ | हाक | — श्री. हरीश उम्रजकर | २० |
| १७ | तव रुपातच साचले सारे आत्मरुप | — डॉ. इंदू नाईक | २१ |
| १८ | ओंम साई | — डॉ. ग.स. कामत | २१ |
| १९ | साई मला करांच्या ओंजळीत झेलीत गेले | — श्री. अरविंद बारटक्के | २२ |
| २० | श्रद्धा-सबुरी | — सौ. उषा मुळे | २२ |
| २१ | शब्दांवरही साईंची सत्ता | — श्री. तु. नाईक | २३ |
| २२ | बाबा बाबा साईबाबा | — सौ. शोभा देशपांडे | २३ |
| २३ | प्रार्थना (श्री साईनाम) | — सौ. अनिता कोरडे | २४ |
| २४ | साईलीलामृत अखंड गाईन | — श्री. विलास कुलकर्णी | २४ |
| २५ | ही भक्ती भोळी | — श्री. र.श्री. पुजारी | २५ |
| २६ | साई समर्था | — सौ. वासंती नांदेडकर | २५ |
| २७ | नवरात्र | — डॉ. सुमन खानवीलकर | २६ |
| २८ | महिमा शिरडीचा | — प्रा. श्री.एच.बी. महाले | २६ |
| २९ | पसायदान | — श्री. मधुकर कोथमिरे | २७ |
| ३० | साईबाबा वंदन | — छाया सापळे | २७ |
| ३१ | साईकृपा | — सुधा मुळे | २८ |

| क्रमांक | कवितेचे शिर्षक | कवि-कवियत्रीचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| ३२ | शोध | — श्री. देवकीनंदन सारस्वत | २८ |
| ३३ | थोर तुझे उपकार | — डॉ. विनायक दुर्गे | २९ |
| ३४ | व्याधि मुक्त झालो चिरंतर | श्री. बा.बा. चमणकर | २९ |
| ३५ | साई माऊली | — सौ. शकुंतला रामटेके | ३० |
| ३६ | शिर्डीचा देव - साईबाबा | श्री. दत्तात्रय खळेकर | ३० |
| ३७ | साई माऊली | — सौ. शांता सरोदे | ३१ |
| ३८ | साईलीला | — श्री. श्याम नरसे | ३१ |
| ३९ | साईबाबांची एकात्मता | — श्री. संजीव चंदने | ३२ |
| ४० | द्वारकेचा कृष्ण मुरारी | — सौ. शकुंतला जगतकर | ३२ |
| ४१ | साईकृपा | — श्री. राजन शिंदे | ३३ |
| ४२ | साई माझे कल्पतरु | — कु. सिंधु थोरात | ३३ |
| ४३ | साईनजर | — श्री. जगदीश देवपुरकर | ३४ |
| ४४ | नको दाखवू आभास | — सौ. शीला वाघ | ३४ |
| ४५ | तुझेच साई सगळे करणे | — श्री. विजय हजारे | ३५ |
| ४६ | भावना | — सौ. सुधा कदम | ३५ |
| ४७ | पणाला माझी लागली आन! | — श्री. नागेश मोगलाईकर | ३६ |
| ४८ | श्री बाबांचे आगमन | — श्रीमती रुक्मिणी बेंद्रे | ३६ |
| ४९ | तो दिसला परमेश्वर शिर्डीला! | — श्री. बाळासाहेब नाडकर्णी | ३७ |
| ५० | करावे नेत्र हे माझे दान | — सौ. विजयालक्ष्मी चौगुले | ३७ |
| ५१ | साई एक मनी | — श्री. अजित पावसकर | ३८ |
| ५२ | शिरडीला जाऊ | — सौ. आशालता भालेराव | ३८ |
| ५३ | श्रीहरी | — सौ. मिना सावंत | ३९ |
| ५४ | साई गौरव | — सौ. कांचन चुरी | ३९ |
| ५५ | साईनाथ साईनाथ | — श्री. द्वारकानाथ दाभोलकर | ४० |
| ५६ | क्षमा करा मजवर तूं साईबाबा | — श्री. भाईशंकर मायतुरा | ४० |
| ५७ | दिसला मोक्षाचा शिशा | सौ. वसुंधरा चोरे | ४१ |
| ५८ | मनाची आंस | सौ. सुधा गानला | ४१ |
| ५९ | साईनाथ मंत्र जपत हिंड तू जगात | — कु. निलम दोशी | ४२ |
| ६० | साई तुझे नाम | — सौ. मंदा इनामदार | ४२ |
| ६१ | साईभक्ती | — कु. बेबी केशव शेट्टी | ४३ |
| ६२ | कृपा कर श्री साई मजवर | — श्री. राजेंद्र गवळी | ४३ |
| ६३ | पाऊले चालती शिरडीची ही वाट | — रोहिणी जाधव | ४४ |
| ६४ | शिर्डीलाच जायचं आहे | — श्री. मोहन सोनवणे | ४४ |
| ६५ | सर्वसाक्षी साई तू | — श्री. द.रा. तळेकर | ४५ |

| क्रमांक | कवितेचे शिर्षक | कवि-कवियत्रीचे नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| ६६ | श्री साईलीला | — सौ. मधु गायकवाड | ४५ |
| ६७ | मागणे | — सौ. भावना जेऊरकर | ४६ |
| ६८ | साई माऊली | — श्री. चंद्रकांत गरगटे | ४६ |
| ६९ | बाबांजवळ मागणे | — सौ. सरोजिनी मुळ्ये | ४७ |
| ७० | साईगीत | — कमल मुळ्ये | ४७ |
| ७१ | साई येती घरा | — श्री. स.मा. मुऱ्हार | ४८ |
| ७२ | श्री साई समर्थ | — श्री. अंकुश सुर्वे | ४८ |
| ७३ | सर्वस्व | — डॉ. सौ. मालती राहाटे | ४९ |
| ७४ | साई भगवान | — सौ. लीला मराठे | ४९ |
| ७५ | रुप तुझे पाहता साई | — श्री. एम.एन. खटावकर | ५० |
| ७६ | श्री साईंच्या चरणी | — श्री. अशोक पाटील | ५० |
| ७७ | साई साई गोविंद सगळे | — सौ. कलावती चव्हाण | ५१ |
| ७८ | जय साईनाथा | — कुमारी वैशाली मिरगळ | ५१ |
| ७९ | साईबाबा तुम्हांस | — श्री. सादिक शेख | ५२ |
| ८० | मनोगत माझ्या मनाशी | — श्री. ताराचंद चव्हाण | ५२ |
| ८१ | दारी आलो तुझ्या साईनाथा | — श्री. मनोहर धुमाळ | ५३ |
| ८२ | सबका मालिक | — श्री. भाऊ शिगवण | ५३ |
| ८३ | साईश्वर माझा त्राता | — श्री. प्रदिप पिरणकर | ५४ |
| ८४ | माफीचे साक्षीदार | — श्री. भालचंद्र गंद्रे | ५४ |
| ८५ | प्रेमाचे माहेर | — श्री. प्रभाकर कोळमकर | ५५ |
| ८६ | भगवान श्रीकृष्णाचा पाळणा | — श्री. नटवरलाल विसपुते | ५५ |
| ८७ | जेव्हां तूं येशील माझ्या द्वारी | — सौ. कल्पना कोरडे | ५६ |
| ८८ | लय लागते | — श्री. शहाणे | ५६ |
| ८९ | साईराया माझ्या बंधुराया | — कु. रंजना बोन्हाडे | ५७ |
| ९० | महानिर्वाण | — श्री. बबन येरम | ५८ |
| ९१ | नमो साई - नमो साई | — श्री. विजयकुमार कुलकर्णी | ५८ |
| ९२ | साई गझल | — श्री. प.वा. गाढे | ५९ |
| ९३ | जातो माघारी साईनाथा | — श्री. सुधाकर चव्हाण | ६० |
| ९४ | शिरडीला चला | — श्री. भुकन पाटील | ६० |
| ९५ | स्वामी समर्थ | — श्री. माधव पवार | ६१ |
| ९६ | साई माऊली | — श्री. अशोक साळसकर | ६२ |
| ९७ | श्री साईबाबांची आरती | — श्री. बी.ए. औखाडकर | ६३ |
| ९८ | शिरडी वृत्त | — | ६३ |

# हा साईकाव्य बहार विशेषांक



## संपादकीय

साईभक्तांनो, साईप्रेमींनो तुमच्या अत्यंत आवडत्या व दरमहा अती उत्कंठतेने ज्याची वाट पहाता त्या श्रीसाईलीला मासिकाचा हा साईकाव्य बहार विशेषांक नेहमीप्रमाणे फेब्रुवारी महिन्यातच प्रकाशित करून तो आता आपल्या हाती देत आहोत. दरवर्षी हा अंक म्हणा फेब्रुवारीतच प्रकाशित होत असतो व तो श्री साईलीला अखिल भारतीय लेखक-कवी-कवयित्रींच्या भरलेल्या मेळाव्यात अध्यक्षांचे शुभहस्ते त्याचे विमोचन करून तो सर्व भक्तांचे हाती पडतो. पण यंदा तो प्रथम श्रीसाई चरणी ठेऊन आता तो तुमच्या हाती येत आहे. नित्याप्रमाणेच श्री साईकाव्य रुप प्रसाद म्हणून त्याचा आपण स्वीकार कराल अशी खात्री आहे.

भक्ती मार्ग अवलंबिण्याचे अनेक प्रकार आहेत त्यात वाचा आणि मूक असे दोन प्रमुख मार्ग. या दोन मार्गांनी भाविक, भक्त आपापल्या इष्ट देवतेची भक्ती विविध प्रकारे साधतो. काही मंडळी भजन, पूजन, अर्चन, उपासना, पोथीपारायण करून भक्तीमार्गाकडे वळतात. वाचा मार्गाने जाणारी मंडळी गुणगान व नामस्मरण करून भक्तीची ज्योत प्रज्वलीत करतात. तर काही मूक मनाने लेखन करून भक्ती साधतात. या दोन्ही मार्गाने वातावरणात विशिष्ट प्रकारच्या स्पंदन लहरी उमटवल्या जातात व त्या इष्ट स्थळी इष्ट देवतेकडे पोचतात असा जाणकारांचा कयास आहे. पण या दोन्ही ठिकाणी मनाची एकाग्रता मात्र नितांत आवश्यक आहे.

या सुंदर, संग्राह्य अंकात सुमारे एकंदर शहाण्णव कविता समाविष्ट असून त्या एकत्रित करून भक्तांच्या हाती ठेवल्या आहेत. यातील विषय एकच — भगवान श्री साई — एकाच विषयावर गाणी, गीते, पदे, आरत्या, गझला, अहिराणी गीते इ. विविध काव्य साहित्य प्रकार छापणारे श्री साईलीला हे असे एकच एक मराठीतील मासिक होय. यामुळेच की काय या अंकाद्वारे आपल्या श्रद्धायुक्त साई भावना लेखन द्वारा प्रगट करण्यासाठी कितीतरी साईभक्त कवी-कवयित्री आपापली काव्य रचना सहा-सहा महिनेच काय चांगले आठ-दहा महिने अगोदर पाठवून देतात. ती या खास वैशिष्ट्यपूर्ण अंकातच प्रसिद्ध व्हावी अशी मनोमन इच्छा प्रगट करतात. त्यांची सद्इच्छा सफल करण्याचा कसोशीने यत्न श्री साईलीला कडून होतो. लेखन द्वारा भक्तीमार्ग साधण्याचा कवी मंडळींचा हा यत्न स्तुत्य नाही असं कोण बरं म्हणेल!

भक्तांनी आपल्या इष्ट देवतेचे केलेले नामस्मरण, त्यांच्या अगम्य लीलांचे विविध भावनांनी केलेले वर्णन, त्यांच्या ठायी असलेली आपली अढळ श्रद्धा आणि निष्ठा इ. चे भक्तांनी केलेले कोडकौतुक या अंकात ठायी ठायी सापडेल.

अनेक भक्त मंडळी ठिकठिकाणच्या सभा संमेलनांना, कार्यक्रमांना जातात. त्यांच्या हाती हा साईलीलाचा साईकाव्य बहार विशेषांक बऱ्याचदा दिसतो. संधी मिळताच भक्त आपण स्वतःच चाल लावून यातील गीत म्हणतो व स्वतःला धन्य मानतो. अनेकांनी आजवरच्या साईकाव्य बहार अंकातील आवडणारी पदे स्वतः आपल्या वहीत लिहून काढून त्यांना चाली बसविल्या आहेत हे पण आमच्या पहाण्यात आहे आणि म्हणूनच वर्षातून एकदा असा हा अपूर्व काव्य विशेषांक काढून तो भक्तांच्या हाती देण्यात एक प्रकारची सुयोग्य साई सेवा आपण करीत आहोत याबद्दल कृतकृत्यता वाटत असते.

*****

## 'साई-साई' मंत्र घोष हा करील मार्ग मोकळा

नासाग्री चीत्त स्थिरतां, सुटे परिमळ सोगंधाचा
जणू वाटे कुंभ फुटला, स्वर्गीच्या अत्तराचा।
परि तो देवची वाटे योगी जनमनाला।
देव कसा कोठे आहे ठाऊक न तुला मला
''साई-साई'' मंत्र घोष हा करील मार्ग मोकळा ॥ १ ॥
योगासनात बसता, घणघणे अनाहत नाद।
महेशाच्या उत्थापनाची ती शंखाची साद।
परि तपस्याला वाटे देव भेटाया आला।
देव कसा कोठे आहे ठाऊक न तुला मला
''साई-साई'' मंत्र घोष हा करील मार्ग मोकळा ॥ २ ॥
कधी कोणा देव, दिसे भव्य दिव्य ज्योत।
तेजोराशिवलयांकित बसलेली इंद्रधनु मखरांत।
परि ती ज्योत देवची वाटे ऋषीमुनीगणाला।
देव कसा कोठे आहे ठाऊक न तुला मला।
''साई-साई'' मंत्रघोष हा करील मार्ग मोकळा ॥ ३ ॥
त्रिवेणी संगमी नाना तिर्थे भ्रमता।
देव न दिसे अजून कोणाला।
(परि) कलीयुगी साई भेटतां शिरडीला।
देवची वाटला एकमेव मला।
देव कसा कोठे आहे, ठाऊक न तुला मला।
''साई-साई'' मंत्रघोष हा करील मार्ग मोकळा ॥ ४ ॥

— **डॉ. रा.सी. कापडी**
राजारामपुरी, कोल्हापूर.

# माझी आई माझी साई

किति प्रेमळ सुंदर मूर्ति,  
माझी आई, माझी साई ॥ धृ. ॥

शिरडी मध्ये निवास केला,  
जग कोठे हा नाहि फिरला,  
सांगितले ह्याने हो ज्ञान,  
सांगितली गीताई- माझी आई ॥ १ ॥

श्रद्धा सबुरी दोनच पैसे,  
मागतसे हा खासे ऐसे,  
ज्याने दिधले हे दो पैसे,  
झाला तो उतराई - माझी आई ॥ २ ॥

गुरु पादुका स्थान आगळे,  
वैशिष्ट्याचे तेज निराळे,  
कडु लिंबाची एकच फांदी,  
गोड करूनी दावी- माझी आई ॥ ३ ॥

साई मंदिर, शांती मंदिर,  
प्रेम भक्तिचा अथांग सागर,  
प्रेम शांतीने भक्त डुंबति,  
न्हाऊ घालिते साई,- माझी आई ॥ ४ ॥

मशिद माई- द्वारका माई,  
बाबांची ती गाथा गाई,  
अशक्य येथे शक्य जाहले,  
दिप उजळले पाण्यानी- माझी आई ॥ ५ ॥

दामोदर बाबरे हो यांचे,  
चावडी स्मारक असे हे साचे,  
निष्काम भक्तिचा मार्ग दाविला,  
चिंचणीच्या अण्णानी- माझी आई ॥ ६ ॥

मागि आता पासायदान,  
कृपा प्रसादे करी तू पावन,  
नको दूर लोटू तू आता,  
कुशीत घेई आई- माझी आई ॥ ७ ॥

**— डॉ. प्रफुल्ल बाबरे**  
रावते बिल्डिंग, १ ला मजला,  
पोर्तुगीज चर्च, दादर, मुंबई-४०० ०२८.

# संतांच्या विभूती जगी का अवतरती?

साई सम हे संत महंत नित्यचि अवतरती।
माऊली सम दक्ष सदैव जगती हे रहाती ॥ १ ॥

भूक लागता क्षीर पाजते बालकास आई।
ज्ञानामृत पजिती स्वहस्ते मुमुक्षूस साई ॥ २ ॥

घार हिन्डते उंच आकाशी लक्ष तरी ते पिलावरी।
जरी शरीरी नसे जगी ह्या भक्त रक्षिती तरी ॥ ३ ॥

दुष्ट पोरही कुशीत घेते थोर किती आई।
सम दृष्टीने सदैव पाही सद्‌गुरु साई ॥ ४ ॥

पोरासाठी जागत राही माय माउली खरी।
साई संत भक्तांसाठी धाउनि जाई त्वरी ॥ ५ ॥

सेवा हाची धर्म मानुनि रहावे ह्या जगती।
शास्त्राचा हा सार गहन जो सरळ करूनि देती ॥ ६ ॥

श्रद्धा सबुरी मंत्र दीधला संजीवनी सम हा।
श्रद्धेने निश्चिंत होत असे जगती मानव हा ॥ ७ ॥

अंगी सबुरी आणताच हे शांत चित्त होई।
जगी भक्ति हा मार्ग मुक्तिचा दावी तू साई ॥ ८ ॥


संतोषी नर सदा सुखी हे जगी सर्व जाणी।
खोटी ही जगी कशी ठरेल साईची वाणी ॥ ९ ॥

पाहू जाता विचित्र वाटे संतांच्या विभुती।
अशक्य ऐसे कार्य, तरीही शक्य करूनि देती ॥ १० ॥

मायेचे हे बंधन कैसे आणि बद्धस्थिती।
अयोग्य तेची योग्य भासते गुंगली असता मती ॥ ११ ॥

व्याकुळ होउनि भक्त बालके जगती हाकारिती।
साईसम हे संत महंत नित्यची अवतरती ॥ १२ ॥

— श्री. मधुकर अंबाडे
अंबाडे हाऊस, लकडी पुलासमोर, बडोदा



# साई धाव घे माझे आई

साईऽऽऽ माझी आईऽऽ
धाव घे माझे आई
तुझी पोर संकटाने वेढली
जगण्याची आस आता सोडली
साईऽऽऽ माझे आई ।। १ ।।
तुजवाचून कोण मज तारी आता
सगे सोयरे गंमती बघती आता
ह्या मोहपाशातुनि सोडवी आता
तुझ्यावाचून कोण माझा त्राता?
साईऽऽऽ माझे आई ।। २ ।।
तुझ्या दरबारी येती पण सगे ना ओळख देती
अशी रक्ताची नव्हे सारी पैशाची नाती
एका हास्याचेही मोल घेती
होती हात जोडोनि नतमस्तक
पण मनात खोट्या अभिमानाचा उद्रेक
साईऽऽऽ माझे आई ।। ३ ।।
नको साई अशी बुद्धी देऊ
शक्ती दे एवढी संकटे अनंत झेलवू
श्रद्धा सबुरीचा मार्गच घेऊ
पण अंत आता नको पाहू
साईऽऽऽ माझे आई ।। ४ ।।
माझ्या चढत्या उतरत्या आयुष्याचा तूच साक्षीदार
मिळवून देशील न्याय हाच तुझा आधार
एकदाच सोड देवा तुझ्या दयेचा पाझर
साईऽऽ साईऽऽऽ धाव घे माझी आई ।। ५ ।।

**— सौ. अलका अरुण जवळकर**
प्लॉट नं. ७१, माहेश्वरी सोसायटी,
सहकारनगर नं. २, पुणे-९.

# रथ चालना चालना शिरडी गावले

**(कानबाईच्या चालीवरील अहिराणी गीत)**

रथ चालना चालना शिरडी गावले
त्याले बलाईल्या, बलाईल्या तांबट गल्लीले
कयस लेवानासे, लेवानासे साईबाबाले ॥ १ ॥

रथ चालना चालना शिरडी गावले
त्याले बलाईल्या, बलाईल्या वाणी गल्लीले
नारय लेवानसे, लेवानसे साईबाबाले ॥ २ ॥

रथ चालना चालना शिरडी गावले
त्याले बलाईल्या, बलाईल्या मायी गल्लीले
फूलहार लेनासे, लेनासे साईबाबाले ॥ ३ ॥

रथ चालना चालना शिरडी गावले
त्याने बलाईल्या, बलाईल्या शिंपी गल्लीले
कफनी शिवनीसे, शिवनीसे साईबाबाले ॥ ४ ॥

रथ चालना चालना शिरडी गावले
त्याने बलाईल्या, बलाईल्या सोनार गल्लीले
मुगूट घडनासे घडनासे साईबाबाले ॥ ५ ॥

रथ चालना चालना शिरडी गावले
त्याने बलाईल्या, बलाईल्या बामन गल्लीले
पूजा करनीसे करनीसे साईबाबानी ॥ ६ ॥

रथ चालना चालना नवापूर गावले
त्याले बलाईल्या, बलाईल्या सेवा मंडयमा
मंदिर बांधनंसे, बांधनंसे साईबाबानं
मंदिर बांधनंसे, बांधनंसे सातलाखनं
रथ थांबना... थांबना... नवापूर गावले ॥ ७ ॥

(शब्दार्थ : बलाईल्या- बोलावून घ्या, कयस-कळस, लेवानासे-घ्यायचा आहे, नारय-नारळ, मायी-माळी, बामन-ब्राह्मण, मंडय-मंडळ)

**— श्री. रमेश डी. चव्हाण**
साईनिकेतन,
मु.पो.ता. नवापूर, जि. धुळे-४२ ५४१८.

# माझी आई माझा साई


माझी आई, माझा साई
प्रेमाची सावली माझी आई माझा साई
तुजवीण जगात नाही मज कोणी
आई, बाप, भाऊ, बहीण सारे काही तूच साई!
तूच माहेर तूच सासर
दयासागरा तूच साई
तूच तारीशी सौख्यदाता
संकटकाळी राहशी उभा
पाठीराखा तूच असशी
सारे काही तूच पाहशी
संकटाची न पडू देती सावली मजवरती
सावली मजवरती.
परस्पर तू नष्ट करीशी भासही ना दावीशी
सारे काही तुजपर्यंत लगेच ते पोचते
झटकन पटकन वेळोवेळी पावती मिळते
रे सखया पांडुरंगा दत्त महाराजा
गणाधीश जो शीवमूर्त जो वसशी साईमया
म्हणून म्हणते साईनाथा
नतमस्तक ठेवूनी येते त्रिवार शरण
तुला त्रिवार शरण! तुला त्रिवार शरण!
क्षमा करूनी कुरवाळीशी बालकापरी मला
तू गाय मी वासरू
तू गाय मी लेकरू
माझे विषयी नको धरू कठोरता मनी
तुजवीण अन्य त्राता मज नाही कोणी
तू असता सदा पाठीशी
भयभिती शिवेल कैसी?
निर्धास्त मी जाहले, निर्धास्त मी जाहले.
नच दिसशी नयनी, नच दिसशी स्वप्नी
नच दिसशी जागेपणी, नच दिसशी झोपेतही
तरीही क्षणोक्षणी मज अस्तित्व दाविशी
माझी आई माझा साई!
प्रेमाची सावली
माझी आई, माझा साई!

— सौ. मीनाक्षी म. नाईक
लीलाशंकर सोसायटी, ब्लॉक नं. १८,
तळमजला, लोकमान्य टिळक नगर, रोड नं. ६,
गोरेगाव (प.), मुंबई-४०० ०६२.

# साईचा दरबार

येळकोट, येळकोट जय मल्हार।
बोला येळकोट मल्हार,
पाहू साईचा दरबार॥ धृ॥
भक्त करतात वारी,
नवसाला पावे साईमल्हारी।
करी जगाचा उद्धार॥ १॥ बोला करी जगाचा उद्धार
बालवय सुकुमार,
रूप दीसे भारी सुंदर।
साई बसले पारावर ॥ २ ॥ करी....
आलं खंडोबाचं वारं,
खोदा इथे म्हणे सत्वर।
उघड झाला हा आवतार ॥ ३ ॥ करी....
पाहीले खोदून भराभर,
जपमाळ ताटावर।
समई तेवती सुंदर॥ ४॥ करी.......
माझ्या गुरुचे धन,
श्रद्धा-सबुरी मिळाले दान।
त्याचा प्रकाश चौफेर॥ ५॥ करी.......
दर गुरु शुक्रवार,
धुप जाळीती समोर।
त्याला म्हणती गुरुद्धार॥ ६॥ करी.......
दत्तु म्हणे साई थोर
आहे देवाचा आवतार
आपण बसला दगडावर करी जगाचा उद्धार॥ ७॥ करी...


**— शाहीर दत्तात्रय महादेव मोरे**
४७०, साईमंदीर, तोपखाना,
शिवाजीनगर, पुणे-५.



# आरती साईबाबांची

तारी तारी तारी आता साईनाथा ॥ बाबा साईनाथा
तुझीया चरणाशी ठेवी मी माथा।
थकले मी वाचिता संसार गाथा ॥ बाबा संसार गाथा
तूची एक सोडविशी संकटी आता।
शिणले रे मी तुझी वाट पहाता ॥ बाबा वाट पहाता
सोडी तोडी भवबंध तूची एकनाथा।
तूची एक दयाळू कृपावंत दाता ॥ बाबा कृपावंत दाता
देह हा सरु दे तुझे नाम गाता गाता।
बडू लागले मी भव सागरी ॥ बाबा भव सागरी
काम क्रोधाचे पाठी लागले अरी।
विपत्तींचे चोर हे ठेचिती मला ॥ बाबा ठेचिती मला
अशा ह्या काळामध्ये कैसे स्तवू तुला।
भुला घातला मला भुला घातला ॥ बाबा भुला घातला
षड् विकारांनी माझा गळा दाबला।
तूची एक तारी मज तूची एक ॥ बाबा तूची एक
पायांशी आले बाबा मी तुझी लेक।
अहंकाराचा माझ्या दीप जळू दे ॥ बाबा दीप जळू दे
देह अभिमान माझा सारा गळू दे
वैराग्याचा काकडा दे माझ्या हाती ॥ बाबा दे माझ्या हाती
तुझ्या आशीर्वादे टिळा लागू दे माथी।

**— सौ. नीता उल्हास जाधव**
६२९, सरेकर आळी,
महाड, रायगड.



# श्रीनाथांचे चरण धरू

शिरडी जाऊन दर्शन घेऊ श्रीनाथांचे चरण धरू
सुखदुःखाचा भव सागर हा साईकृपेने पार करू ...
शिरडीवासी साईनाथ
जयजयसाई शिरडीनाथ

दत्त दिगंबर हा शिवशंकर
ब्रह्माविष्णू देव शुभंकर
निराकार हा ये आकारून नाम तयाचे नित्य स्मरू ...
शिरडीवासी साईनाथ
जयजयसाई शिरडीनाथ

साधू योगी ऋषी मुनीवर
संत महात्मा जोगी गुरुवर
भक्तजनांना ठेवून गेला मूर्त समाधी कल्पतरू ...
शिरडीवासी साईनाथ
जयजयसाई शिरडीनाथ

पुनीत पावन शिरडी गाव
श्रीनाथांचे पावन नाव
शततिर्थांचे तिर्थस्थान हे भक्ती भावने स्नान करू ...
शिरडीवासी साईनाथ
जयजयसाई शिरडीनाथ

विसरा जाती विसरा भेद
माणुसकीचा धर्म अभेद
पतित पावन करुणाकर तो नित्य तयाला अनुसरू ...
शिरडीवासी साईनाथ
जयजयसाई शिरडीनाथ

फकीरसाई फकीर वेष
शिरडीचा परी वसे नरेश
मशिद पडकी बने द्वारका धुनी अुदीचे अस्त्र धरू ...

— श्री. मधुकर कृष्णाजी विचारे
१५-बी, भक्ति-सुधा,
वाकोला पाईप लाईन,
दत्तमंदिर रोड,
सांताक्रूझ (पूर्व),
मुंबई- ४०० ०५५.

# साई म्हणे, तो भक्त आवडे मज

जो द्वेशास न थारा देई।
प्रेम करी चराचरी।
सर्वाभूतीं भगवंत पाही।
साई म्हणे, तो भक्त आवडे मज ।। १ ।।

जया माझे अखड ध्यान।
जो मजसी करी जीव प्राण।
जया माझी भूक तहान।
साई म्हणे, तो भक्त आवडे मज ।। २ ।।

जे का रंजले गांजले।
त्यासी म्हणे जो आपुले।
भेदाभेद न करी कसले।
साई म्हणे, तो भक्त आवडे मज ।। ३ ।।

जो सदा संतोष मनी धरी।
यत्कींचतही फिकीर न करी।
श्रद्धा आणि सबूरी धरी।
साई म्हणे, तो भक्त आवडे मज ।। ४ ।।

जो माझे नाम घेतो।
मजशीच शरण येतो।
एक मजकडेच लक्ष देतो।
साई म्हणे, तो भक्त आवडे मज ।। ५ ।।

जो आल्यागेल्याचा आदर करी।
तृषिता जल, भूकेल्या देई भाकरी।
उघड्यास वस्त्र, बसाया देई ओसरी।
साई म्हणे, तो भक्त आवडे मज ।। ६ ।।

जो मात्यापित्यास भजितो।
बंधु भगिनींवर प्रेम करीतो।
इतरांकरीतांही देह झिजवितो।
साई म्हणे, तो भक्त आवडे मज ।। ७ ।।

शंकर म्हणे, तोचि झाला धन्य।
अवघ्यांपरीस जो साईस मान्य।
जय साईवांचून न अनन्य,
दैवत असे ।। ८ ।।

— **श्री. शंकर हरीभाऊ चौबळ**
मधु कुंज हाऊसींग सोसायटी,
प्लॉट नं. १०२, पहिला मजला,
जय प्रकाश रोड, अंधेरी (प.),
मुं.नं.—५८.

# स्वप्न

**(चाल - ब्रम्हा, विष्णू आणि महेश्वर सामोरी बसले)**

शिरडी गांवी मशिदीमजी धुनिजवळी बसले
मला श्री साईनाथ दिसले ।। धृ. ।।
अवती भवती भाविक मेळा
विनोद गोष्टी पहा चालल्या
शामा, नाना, काका, अण्णा
कौतुके डुलले! मला श्री--- ।। १ ।।
कुणी पाद संवाहन करिती
कुणी प्रीतिने अंग रगडिती
कुणी भरूनी चिलीम देती
सेवेमधि रंगले! मला श्री----- ।। २ ।।
कुणा बोलविता जवळी प्रेमे
वात्ताडन कुणा करिती लटके
क्षणांत हसविती क्षणांत रडविती
खेळ करित बसले! मला श्री----- ।। ३ ।।
बहुरंगी नट सखाश्री साई
विविध रंग हा उधळीत जाई
सहज मनाला घाली मोहिनी
भान नच उरले! मला श्री----- ।। ४ ।।
चमत्कार इतुक्यातच झाला
सोऽहं ऐसा ध्वनी ऐकला
प्रकाश किरण मम हृदयी शिरला
स्वप्न हे तुटले! मला श्री---- ।। ५ ।।

**— श्री. भास्कर गो. जोशी**
साईप्रसाद, ४२, श्रीकृष्णनगर,
बोरीवली (पूर्व),
मुंबई - ४०० ०६६.

# जय श्री साईबाबा

जयदेव जयदेव, जय श्री साईबाबा
आशीर्वाद तुमचा मजवर असावा
मुक्ती देशी तू क्लेशातून
सुख देशी तू दुःखातून
सुटका करीशी संकटातून
मार्ग दाखविशी आडमार्गातून
जीवनी सदा साक्षात्कार घडावा ॥ १ ॥
भक्तीभाव तुजवर भक्तांचा
हा वर्षाव आरती नवसांचा
त्यांची तू होतेस माय
शिर्डीस ज्यांचे लागती पाय
होवूनी माय मार्ग दाखवावा ॥ २ ॥
सर्व चरा चरांचा तू दाता पिता
समाधीवर डोके भक्त टेकविता
सबुरीतूनच मार्ग दाखविता
भक्तांचे दुःख पूर्ण मिटविता
प्रत्येक पाऊली मनी तू रहावा ॥ ३ ॥
ज्यांनी ज्यांनी तुम्हा आठविले
ज्यांनी ज्यांनी तुम्हा भजले
त्यांना त्यांना तुम्ही पाहिले
भक्तितून जिव हा पायी वाहावा ॥ ४ ॥
जयदेव जयदेव जय श्री साईबाबा
आशीर्वाद तुमचा मजवर असावा

— **श्री. प्रदिप ग. कोरगावकर**
१/१, विजय निवास, शिवाजी नगर,
टेंबीपाडा रोड, भांडुप (प.), मु.नं. - ४०० ०७८.

# श्री साईलीला

शिरडीचे श्री सद्‌गुरु साई
काय सांगू लीला अगाध तुझी ॥ धृ० ॥
बालफकीर रुपी प्रकटले
म्हाळसापतीस ते दिसले
"आओ साई" ऐसे ते वदले
नामकरण झाले तेव्हा साई
ऐका कथा ही शिरडीश्वराची ॥ १ ॥

निंबातळी नित बसत असे
जनसेवा नित करीत असे
गोड झाली त्या निंबाची पाने
साईच्या त्या अजब किमयेने
गुरुस्थान ते साईचे असती ॥ २ ॥

चावडीत त्या नित्य नियमे
चिंध्याबंध फळीवर साई झोपे
द्वारकामाईत त्या साईने
पाण्याचे दिव्य दिवे जाळीले
लीला पाहूनी भक्त भान विसरती ॥ ३ ॥

दीन-दलितांच्या सेवेमध्ये
श्री साई नित्य रमत असे
मी भोळा सेवक तुमचा आहे
ही सारी लीला अल्लाची असे
ऐसे वदत नित लोकांना साई ॥ ४ ॥

— **श्री. हसमुख ओंकार पाटील**
"साई-श्रद्धासबुरी", ८९५, गुजरगल्ली,
नवापूर-४२५४१८, जि. धुळे.

# साई तुझे पाय, लाख मोलाचा ठेवा!

साई, तुझे पाय, लाख मोलाचा ठेवा,
जन्मोजन्मी घडावी तुझीच रे सेवा ।। धृ. ।।

साई दर्शनाची अंतरात आस,
तुझ्याच नामाचा मला लागे ध्यास,
मन उतावीळ, करी शांत त्यास,
भक्तीचा सुगंध जीवनी उरावा ।। १ ।।

साई, तुझ्यातच एकरूप व्हावे,
माझे तन-मन तुला समर्पावे,
जसे वाती-ज्योतीचे नाते असावे,
शब्दात तव महिमा कसा गावा? ।। २ ।।

साईंच्या उदीचा महिमा असे थोर,
रोग, संकटे पळती किती दूर,
भाळी लावितांना करा थोडा विचार,
माया, अहंकार धुनीत जळावा ।। ३ ।।

**— सौ. संगीता गोडबोले**
एम्.ए.बी.एड्.
प्लॉट नं. ३७२, सेक्टर २८,
प्राधिकरण, 'परिमल' बंगला,
पुणे - ४११ ०३५.

◆◆◆◆◆◆◆◆◆◆

# हाक

असुरासम भ्रष्टाचार आहे, दिव्याखाली अंधार आहे
सरळ जीवन जगणे येथ, नेहमी निराधार आहे

दिसतात सहज सर्वत्र, सदा समानतेचे फुगे
पैशासाठी उठाठेव करणारे, ठकवणारे दिसती ठगे

स्वार्थाचा हा घोळ, हावरेपणाचा खेळ आहे
कष्ट आहेत मातीमोल, विचार आचारांचा ना मेळ आहे

पोटासाठी, पोटच्यांसाठी राहतात नेहमी दंग
सत्यतेचे, अहिंसेचे असते नुसते ढोंग

काहींचा खिसा चोख आहे, माणुसकीची राख आहे
अशा या जगण्यात साई, तुझ्या मुल्यांची भूक आहे!

**— श्री. हरीश गोपाळराव उम्रजकर**
द्वारा ॲड. श.ना. अंबुलगेकर,
वकील कॉलनी, कंधार,
जि. नांदेड- ४३१ ७१४.

# तव रुपातच साचले सारे आत्मरुप

स्व स्वरुपी तुजला देखियले
मग जीवन सार्थकी झाले
तुवा देखिले मी मम हृदयी
जव मी तव हृदयची जाणिले।।


तूच अससी सर्वा भितरी
हे जीवनाचे मर्म समजले
जानूनी घेता तव पुण्यात्मा
मज स्व स्वरूप उमजले।।

शोधीत होते तुला भगवंता
न जानता नी न समजता
एका एकी प्रकाश पडला
ज्ञान चक्षु तूच उघडला।।

समीप आला क्षण सुखाचा
म्हणूनी जाणिले मी तव रूपा
तूच सर्वा आत्मी वससी
जानूनी घेता स्व स्वरुप दिसशी।।

जाणिले स्व स्वरुप
देखिले तव रुप
तव रुपांतच साचले
सारे आत्मरुप।।

— **डॉ. इंदू नाईक**
लोनावळा



## ओंम साई

ही भक्ति अंतरीची
साई तुझ्यामुळें फुलावीं

आनंद कल्पनातीत
हृदयांत मोहरावें

हे जाणल्या वरीच साई
हृदयांतरी भरूनीं येई


हा सर्व ठाव घेतां, वाटे
प्राजक्त जणूं बहरला

कंठांत साई नाम येतां
छेडतात अंतरी (च्या) तारा

घेऊनी त्या सुंगध
दरवळतात आसमंत

साईत सर्व माझें
सर्वस्व विरून जावें

— **डॉ.ग.स. कामत**
११९४/१३, शिवाजी नगर,
पुणे - ४११ ००५.



# साई मला करांच्या ओंजळीत झेलीत गेले

मी अंधारात दिशा शोधित होतो
बाबा तेव्हा प्रकाश होवून आले ॥ १ ॥

मी शब्दात हरवून जात होतो
साई तेव्हा अर्थ बनून साकारले ॥ २ ॥

मी रोज दिवास्वप्ने पहात होतो
एक स्वप्न साई साकार करून गेले ॥ ३ ॥

बागेतही फुलांचा गंध मला जाणवत नव्हता
साई सुगंधाची बरसात करून गेले ॥ ४ ॥

मी आकाशातून खाली कोसळत होतो
साई मला करांच्या ओंजळीत झेलीत गेले ॥ ५ ॥

**— श्री. अरविंद बारटक्के**
बी.कॉम. (ऑनर्स) एम.ए.
१३५, शुक्रवार पेठ,
पुणे - ४११ ००२.

********

# श्रद्धा-सबुरी

एकता एकता इथे नांदती दिव्यता।
हिन्दु मुस्लीम शिख ईसाई।
इथे नांदती भाई-भाई ॥ १ ॥
द्वारकामाई ही तर आमुची आई।
इथेच देती समानतेचा संदेश अम्हा साई ॥ २ ॥
कवि संमेलनात दिसती समानतेची दिव्यता।
सर्व धर्म समभाव जागृती हिच असे श्रेष्ठता ॥ ३ ॥
चला शिरडीला पाहू साईला।
समानतेच्या बंधुत्वाच्या पाहू विभूतिला ॥ ४ ॥
समाधीतूनी बोल उमटती।
बंधुत्वाचा हाथ धरा हाती ॥ ५ ॥
पूजा करूनी नत मस्तक व्हा समाधी वरती
मांगल्याची इथेच मिळते भक्ताना प्रचिती ॥ ६ ॥

**— सौ. उषा प्रभाकर मुळे**
१६०, नारायण पेठ, पुणे-३०.

# शब्दांवरही साईंची सत्ता...

अहो साईनाथा, दीननाथा कृपावंता
कशी वर्णू मी सांगा आपुली शब्द गाथा? ॥ धृ० ॥
शब्दांची पदोपदी वाण
ज्याची मला पुरेपूर जाण!
भोळाभाव चरणीं ठेवितो माथा ...१
नाही ताळमेळ जुळत नाही सूर
थांबून राहूं तरी कुठवर?
तूंच साईनाथा कर्ता करविता ...२
येईल तें गाईन हाच निर्धार
यांत दिसे कुणाकुठें अविचार?
शब्दांवरही साईनाथा तुझीच सत्ता ...३

**— श्री. तु. नाईक**
एम.ए., बी.एड.
विष्णूनगर, डोंबिवली (प.), जि. ठाणे-४१२ २०२.

★★★★★

# बाबा बाबा साईबाबा

बाबा बाबा साईबाबा। बाबा बाबा साईबाबा ॥
तुमच्या नामे फोडीत टाहो। इथे असा मी बसे पहा हो ॥
दर्शन देण्या धावुनि याहो। बाबा बाबा साईबाबा ॥ धृ० ॥
दयासागरा तुम्हीच आई। परी आज कां निष्ठूर होई ॥
दीन दयाळा धावुनि येई। बाबा बाबा साईबाबा ॥ १ ॥
तुम्हा सारखा प्रेमळ पिता। मला लाभला साईनाथा ॥
भक्ताचे मन तुम्ही जाणता। बाबा बाबा साईबाबा ॥ २ ॥
अंतर्यामी तुम्हीच राहता। सर्वांभूती तुम्हीच वसता ॥
कर्ता करविता तुम्हीच असता। बाबा बाबा साईबाबा ॥ ३ ॥
बाबा बाबा साईबाबा। दशन देण्या धावुनि याहो ॥

**— सौ. शोभा देशपांडे**
२।११, आगरकर नगर,
अलंकार टॉकीज शेजारी, पुणे.

## प्रार्थना (श्री साईनाम)

नाम घेतां साईचे, सदा सर्व काळ
जाईल दूर तुझा, आपत्ती काळ ॥
निष्ठा ठेव मनी, साई हाच आधार
साई नाम मुखी, जाईल चिंता पार ॥
दोन हात जोडोनी, कर त्यांना वंदन
देईल तो तुला, आशीर्वाद महान ॥
एक नजर लावून, पहा साई नयनी
पाहील तोची तुला घेईल जवळी ॥
लाव उदी भाळी, ठेव विश्वास मनी
दुःख, रोगराई, जाईल पळुनी ॥
नको जप तप, नको करू उपवास
साईनाम हाच, कर नित्य ध्यास ॥
नित्य नामस्मरण, साईचे कर
या जन्माचा तुझ्या, होईल उद्धार ॥

— सौ. अनिता कोरडे
३१, महंत रोड,
विलेपार्ले (पूर्व), मुबई-५७.

## साईलीलामृत अखंड गाईन

साईलीलामृत अखंड गाईन।
साई! साई! नाम मुखात घेईन ॥ धृ ॥

नामधारका सांगे सिद्ध
चरित्र साईचे केले ओवी बद्ध ॥ १ ॥

शब्दा शब्दात अमृत भरले
अर्थ रुप ते प्राशन केले
देहभान मग तेव्हा नुरले
झालो बेभान - साईनाथा साईनाथा ॥ २ ॥

— श्री. विलास श्रीधर कुळकर्णी
१६ अ/४, मीठानगर म्यु. कॉलनी,
महात्मा गांधी रोड,
गोरेगाव (प), मुंबई-४०० ०९०.

# ही भक्ती भोळी

रोवुनी काटक्या समिधा नीटस चार
उभविणे मंदिरा, बालमना ये लहर
वरि दर्भ पसरिले, झाली शीतल छाया
प्रभु इथे तिथे ना, गुपचुप ये जा ठाया! — १

पाषाण-पादुका झाल्या स्थापन, पूज्य
सिंहासन घंटा चवरी हेही सज्ज
कोरांटी तगरी सदाफुली परसात
घ्या गंधफुले ही, पुष्पांची बरसात! — २

आरती पालखी मंत्रपुष्प ही सेवा
आणिला प्रसादा गुपचुप पेढा, मेवा
जे उणे तिथे हो मानसपूजा दिव्य
ही भक्ती भोळी, तिज कसले प्राप्तव्य! — ३

जे अनन्यभावे करिती गुरुवर आप्त
ते इथे अंगणी औदुंबर छायेत
हा खेळ मोडणे? नव्हे मनासी सहन
प्रभु इथे मंदिरी,त्यासी आमुची आण! — ४

प्रभुहाती तळपे दिव्य सुदर्शन चक्र
त्या पाहता थरके अभक्तदृष्टी वक्र
नतमस्तक होणे पडता दृष्टी स्थान
लोटांगण चरणी घेणे शब्दावीण! — ५

**— श्री. र.श्री. पुजारी**
रमानिवास, ९९२, सदाशिव पेठ,
पुणे - ३०.

# सांई-समर्था

निंब वृक्ष अन् समाधी-स्थान
घडो मला हे, शिरडी-दर्शन
दिसता मंदीर, कळस साचा
गहिवर ये अंगी, रोमांचाचा!

पूजा तुमची, कशी करू मी?
समजून घ्यावी, भोळी भक्ती
अनन्य तुम्हा मी, आले शरण
तुम्हाविण मजला, आहे कोण?
तुम्हीच त्राता, अन् रक्षणकर्ता
हरुनी न्या संकटे, साई-समर्था!

**— सौ. वासंती नांदेडकर** एम.ए.
महिंद्र अँड महिंद्र लि.,
वरळी रोड नं. १३, मुंबई - ४०० ०१८.

## नवरात्र

नऊ दिवसाचे हे नवरात्र
नऊ भक्तीने उमलू देत ही गात्र
प्रथम दिनी मोडीले क्रोधा
मनी धरीले आत्मबोधा
द्वीतीय दीनी सोडूनी लोभा
दाने करून वाढवीली करांची शोभा
त्रितीय दिनी मोडीले मोहा
मनी धरिला विवेक हा
चतुर्थदिनी पिटाळीले मत्सरा
दया क्षमा शांतीचा वाढविला पसारा
पांचवे दिनी मोडीला काम
निष्पाप केले हे शरीर धाम
सहावे दिनी हाकलीला मद
संपविला जीवनातला वादावाद
सातवे दिनी बोलाविले विवेकाला
शांती लाभली मन्मनाला
आठवे दिनी ते आले वैराग्य मना
मोडीले आनंद मानसन्मान धना
नऊवेदिनी भक्तिरसा बहर आला
ठायी ठायी साई दिसु लागला
दहावे दिनी दश इंद्रिया मिळे सुख
साईचे नयन सम्मोहन हालेना मुख.

— डॉ. सुमन खानवीलकर
बॉंबे पूना रोड,
लोणावळा.

## महिमा शिरडीचा

जो आला शिरडी नगरी
त्याची शानच न्यारी
मी आलो तुझ्या दरबारी
करो कल्याण हे साई भंडारी ॥ १ ॥

ज्याने तुझे दर्शन घेतले
सफल त्याचे जीवन झाले
मी आलो तुझ्या दरबारी
करो कल्याण हे साई भंडारी ॥ २ ॥

माझे जीवन तुला मी दिले
का की ते तूच मला दिले
मी आलो तुझ्या दरबारी
करो कल्याण हे साई भंडारी ॥ ३ ॥

मीरेच्या विषाचे अमृत केले
भक्ताचे कसे रक्षण केले
मी आलो तुझ्या दरबारी
करो कल्याण हे साई भंडारी ॥ ४ ॥

ज्याने तुझे ध्यान केले
अज्ञान मग त्याचे हरपले
मी आलो तुझ्या दरबारी
करो कल्याण हे साई भंडारी ॥ ५ ॥

जेव्हा जेव्हा भक्त पिडावले
गीतेतले तू वचन निभवले
मी आलो तुझ्या दरबारी
करो कल्याण हे साई भंडारी ॥ ६ ॥

— प्रा. श्री. एच.बी. महाले
शासकीय जुन्नारदेव महाविद्यालय, जुन्नारदेव,
जिला - छिंदवाडा (म.प्र.)

# पसायदान

मी असा एक हो भोळा। मन अंतरी असे कळवळा॥
षडरिपूंना माझ्या जाळा। बाबा तुम्हीच मज सांभाळा॥
अंतरीची मोठी आस। होऊ द्या आपुले दास॥
करा पापांचा ही ऱ्हास। दूर करा सर्व आभास ॥ १ ॥

बाबांची उदी चिमूट। परमार्थ शिकविल नीट॥
बाबांचे ओठी नाम। सोपे ही कोते काम॥
तन बनते हो निष्काम । मन बनते हो निष्काम॥
नाही दूरी ते हो धाम। मनी दृढ धरा साईनाम ॥ २ ॥

बाबांची छबी प्रेरणा करी। मनी रुजते सबुरी॥
भल्या, बुऱ्यांचे तेच अधिकारी। श्रद्धा वाढविती उरी॥
मन करा माझे सावध। जाळूनि सर्व तो क्रोध॥
तोडूनी सर्व बंधने, मना होऊ द्या गुरु बोध ॥ ३ ॥

मना खूण पटते। बाबा आहेत सर्वां अंतरी॥
आडमार्गी पाऊल जाता। थांबविती नीज करी॥
नामस्मरणे, गुरुकृपेने नीज भक्तां ते जवळ करी॥
मधू तुम्हां विनंती करी। मनी साठवा श्रद्धा सबुरी ॥ ४ ॥

**— श्री. मधुकर मनोहर कोथमिरे**
बी.एस.एसी., बी.एड.,
उपशिक्षक, श्री हनुमानगिरी हायस्कूल,
पुसेगाव, ता. खटाव, जि. सातारा.

# साईबाबा वंदन

**सा**ई-साई दर्शन दे मज आता।
**ई**श्वरी रुप दाखवा हो आता।
**बा**जूला सारा सारी संकटे।
**बा**बा धाव घ्या हो आता।
**वं**दन करते तुजला मी हे दाता।
**द**या दाखवा हे साईनाथा।
**न**का करू आता वेळ साईनाथा।

**— छाया सापळे**
खासकीलवाडा, आयुर्वेद महाविद्यालय,
सावंतवाडी, सिंधुदुर्ग.



## "साईकृपा"

श्री सद्‌गुरु साईनाथा
दया करा आता
तूंच आम्हां माता-पिता
तूंच आमुचा दाता ॥ १ ॥

हिंदु-मुस्लीम सीख ही साई
यांचा तूं चाहता
तुझे नांव ओठावर येता
संकटे दूर जाता ॥ २ ॥

तुमच्या चरणांवर आता
मी ठेविते माथा,
वंदुन चरणी सांगते मी माझी गाथा
तीच साई तुम्ही पुरी करावी आता ॥ ३ ॥

**— सुधा मुळे**
मु. द. मुळे, म.रा. वीज मंडळ,
४०० के.व्ही.आर.एस. (ओ अँड एम)
डिव्हीजन, बाभळेश्वर,
तालुका :- श्रीरामपूर,
जि. :- अहमदनगर.



## शोध

आकाशात उभा बघा
जगजेता परमेश्वर
आम्ही शोधितो त्याला
द्वारका आणि रामेश्वर

तोच आहे लपलेला
प्रत्येकाच्या मनात
त्याला आम्ही वेढतो
या भरलेल्या जगात

आत्म्याशी आम्ही केला
कधी ही नाही संवाद
उलट रोज घालतो
त्याच्याशीच वाद

असा माझा देव
त्याला नाही रंग रुप
जसे बघू तसे
आहे त्याचे स्वरुप

**— श्री. देवकीनंदन सारस्वत** (एम.ए.)
२९५ बळीराम पेठ, जळगाव - ४२५ ००१.

# थोर तुझे उपकार

थोर तुझे उपकार, साई! थोर तुझे उपकार!
उद्धरण्याते आर्त भाविका तूच खरा आधार!! ।। धृ. ।।

विकार जीवन ग्रासे जेव्हा
मार्ग सुटाया दिसे न तेव्हा
दिलीस सन्धी सान्निध्याची संपवुनी संसार ।। १ ।।

सुख शांतीचे लेवुन भूषण
कृतार्थ होण्या मानव-जीवन
संचित हरण्या, निज सेवेचा दिलास मज अधिकार ।। २ ।।

योजुन अपुली प्रेमळ दृष्टी
दिव्य दयेची करण्या वृष्टी
मन-वीणेचे विकार छेडुन थांबविण्या अविचार ।। ३ ।।

साइ-गजानन विभिन्न असती-
द्वैत भावना येता चित्ती
संभ्रम हरण्या मला अचानक दिधला साक्षात्कार ।। ४ ।।

शिर्डीचे तव अद्‌भुत जीवन
व्हावे चित्रित मम गीतांतुन
म्हणून स्वप्नी दिधली आज्ञा होऊनिया साकार ।। ५ ।।


होऊ नये मम वृत्ति बावरी
कृपा-छत्र नित राहो मजवरी
म्हणुनच वाटे शिर्डी क्षेत्री यावे वारंवार! ।। ६ ।।

— डॉ. विनायक गो. दुर्गे
'सौजन्य', शिवाजीनगर, धरमपेठ विस्तार, नागपूर - १०.

# व्याधि मुक्त झालो चिरंतर!

शिरडी तीर्थासी येऊनी पावन मी झालो
साई चरणी मस्तक ठेऊनी देहभान विसरलो
कैसा गाऊं मी महिमा तयांचा ब्रह्माचा अवतार साईश्वर
उदी बाबांची लाविता भाली दुःख गेले जर्जर पार अपार
श्रद्धा सबुरी मंत्र साईंचा करीता साईस्मरण झाली पीडा दूर
भय कसले मज राहिले न आतां व्याधिमुक्त झालो चिरंतर

— श्री. बा. बा. चमणकर
सुलक्ष्मी, कैलासनगर, डोंबिवली (पश्चिम).



# साई माऊली

एके दिनी वनी ऐकती।
प्रेमळ दर्शन देऊन कांती।
एकांतीच्या रम्यक स्मृति।
हसवूनी हसाल कां ॥ १ ॥

ज्ञान वाट दावी मजला।
तुझिया चरणी देह अर्पिला।
मी नमितो साई माऊलीला।
आईची ममता द्याल कां ॥ २ ॥

नकोस राहू दूर शिरडी
दे तू मजला भेट या क्षणी
मनांतील ही आशा माझी
पुरी तव कराल कां ॥ ३ ॥

**— सौ. शकुंतला शंकरराव रामटेके**
उंटखाना ले आऊट, दहिपूरा,
वराडे भवन, प्लॉट नं. ३२७,
नागपूर-९.

# शिर्डीचा देव- साईबाबा

पाहिला शिर्डीचा देव पाहिला शिर्डीचा देव
मनी ठेवूनिया भाव, मनी ठेवूनिया भाव ॥ धृ ॥
पाहिली ती वेदमूर्ती गेली ही माझी भ्रांती।
लाभली मनास शांती, उरला न देहभाव ॥ १ ॥
पाहिले मी ते चरण, हरपून गेलं भान
मनी लाभे समाधान, लोपले मीपण जाण ॥ २ ॥
हात मस्तकी पहाता महामंत्र कानी पडता
कृपा केली साईनाथा, भक्ताशी दिला ठाव ॥ ३ ॥
दत्तु खळेकर रमला, साईचरणी लिन झाला
मुखे साई साई वदला, मनी धरूनिया भाव ॥ ४ ॥

**— श्री. दत्तात्रय गोपाळराव खळेकर**
द्वारा श्री. विजयकुमार द. खळेकर,
मु.पो. राहुरी फॅक्टरी,
ता. राहुरी, जि. अहमदनगर.

# साई माऊली

नसे गायक ना वादक। साई तुझिच मी सेवक।
गाते ताल सुराविण गायन। भोळाभावचि शब्दातून ॥ १ ॥

नसे विद्येचा मज गंध। गाते साई प्रेमाचा आनंद।
मी भ्रमरचि तू सुगंध। साई माझा मधु मकरंद। ॥ २ ॥

शिर्डी आहे माझे माहेर। माया साई माऊलीची अपार।
वेडी खुळी तिची मी पोर। चंद्रालागिं जसी चकोर ॥ ३ ॥

द्यावे भक्तीचे मज खूळ। तुझ्या चरणाची मी धूळ।
गुरुमाय तू दयाळ। पाजी प्रेम पान्हा एक वेळ ॥ ४ ॥

कर्मीचि मी कर्माण । करण साई मज पावन।
साई माझे मन, धन। तुझे पायीं माझे इमान ॥ ५ ॥

प्रेमभक्तीची ही खूण। श्रद्धा, सबूरीची शिकवण।
माझे मन तुझे ध्यान। जिवशिवाचे मिलन ॥ ६ ॥

माझे भजन तुझे कवन। व्हावे साईमय होऊन।
वेडे वाकूडे गाईन। परि तुझिच म्हणवीन. ॥ ७ ॥

**— सौ. शांता अंबाजी सरोदे**
उल्लेंगल बि.नं. ६, खो.नं. १०, एन. सी. केळकर रोड,
दादर, मुंबई-४०० ०२८.

# साईलीला

घडो तुझीं मूर्ती
हृदयी राहो किर्ती
अगाध ईश्वरी लीला
मनि राहो साईलीला
काय? वणर्ऊ भक्तिचें
तेज पाहा चमत्काराचें
उदी कपाळी लावीली
पाप मोक्षें टळाली
संकटे दूर जाती
सत्वरी बहुगुण येती.

**— श्री. श्याम नरसे**
तुकाराम काटकर हाऊस,
माहुल रोड, रु.क्र. ७,
अंबापाडा, चेंबूर-७४.

# साईबाबांची एकात्मता

भारतभूस करा उज्वल एकात्मतेस साक्षून।
पण तत्व असू द्या साईसमर्थास स्मरून ।। धृ ।।

प्राप्तकाळी दिसे एक (स) माज कारण।
पण कुणा न कळले "राज" कारण।
अभाव एकात्मतेचा हेच एक कारण।
विचार करा साक्षीस ठेवून पुराणा ।। १ ।।
पण तत्व असू द्या साईसमर्थास स्मरून...

बीजे एकात्मतेची असती कुटुंबात फक्त।
पण अभाव असे सहकार्याचा त्यांत।
संस्कार संस्कृती करी एकात्मता वृद्धींगत।
विचार करा साक्षीस ठेवून कृष्ण गीत ।। २ ।।
पण तत्व असू द्या साई समर्थास स्मरून....

कुटुंब, समाज, राज्य आणि राष्ट्र।
हेच आहेत आधारभूत सर्वत्र।
वेळ, काळ दर्शवितो फक्त रात्र।
विचार करा साक्षीस ठेवून चारित्र्य ।। ३ ।।
पण तत्व असू द्या साई समर्थास स्मरून....

भारतभूस करा उज्वल एकात्मतेस साक्षून।
पण तत्व असू द्या साई समर्थास स्मरून ।।

**— श्री. संजीव गजानन चंदने**
एम.कॉम.
माणिक कॉलनी, अहिल्यादेवी चौक,
कल्याण - ४२१ ३०१.

# द्वारकेचा कृष्ण मुरारी

श्रद्धा माझी फळास आली
मला भेटली पाऊले साईची
भाव फुलांचे करूनी पैंजण
नुपूर बांधिले मी त्या चरणी ।। १ ।।

रुमझुम नाचे कृष्ण मुरारी
द्वारकेचा तो सावळा हरी
घुमवित बांसरी अनंतातूनी
सूर मनोहर येती कानी ।। २ ।।

त्या सुरांची दिव्य मोहीनी
मोहीत झाली अवघी अवनी
श्रद्धा सबुरी ज्योती लावूनी
पंचारती मी घेते सदनी ।। ३ ।।

**— सौ. शकुंतला शं. जगतकर**
एम.ए.
गोरेगाव, मुंबई.

# साईकृपा

**[चालः- जनी म्हणे नामा....]**

साई माझी माता, साई माझा पिता,
असे सौख्य दाता सकल जनांचा ॥ धृ ॥
साई कृपावंत दिनदुबळ्यांचा
साई मायबाप दुःखी पीडीतांचा
दयेचा सागर साई माझा ॥ १ ॥ असे....
साई दरबारी नसे भेदभाव
साईला समान रंक असो राव
कृपेचा सागर साई माझा ॥ २ ॥ असे....
साई दर्शनाने मी, झालो पावन
साई भजनी मी झालो तल्लीन
त्रिभुवनपालक साई माझा ॥ ३ ॥ असे....

**— श्री. राजन शिंदे**
३१८६, टिळक आळी, रत्नागिरी.

# साई माझे कल्पतरु

साई माझे कल्पतरु
कल्पनेच्या आठवणीला किती आवरु
मृगजळामागे धावले जरी लेकरु
साईदृष्टी लेकरास कृपावृष्टी वरु
सत्यनिष्ठ, स्वाभिमान, एकात्मतेने जगी वावरु
साईलीलेचे प्रताप क्षणोक्षणी आत्मसात करू
साईगुरुच्या कृपादृष्टीने दुःखाचे वलय दूर करू
सिंधु सागराच्या अथांग प्रलयावर सुखाने मात करू
जग हे सर्व असे बंदिस्त शाळा
तेथे कोण-कोणास घालेल मनावर आळा
प्रत्येकाचा आप-आपला ढंग न्यारा
साईगुरु भक्तास दाखवी त्यातूनही योग्य किनारा
आशा-आकांक्षा, साफल्याचे देणे त्यातच साईभक्तांना निवारा

**— कु. सिंधु रंगराव थोरात**
बि.नं. ४८/२३१२,
गुलमोहर को.ऑ. सोसायटी (गांधीनगर),
बांद्रा (पूर्व), मुं.नं.-५१.

# साईनजर

सरसर आली झरझर सर पावसाची
भरभर झाली घरभर नजर ओली नवसाची

दूर दूर गेले सारे साथी तोडूनी नातीगोती
नसता काही वळुनी पाही समाधीतली ज्योती

पैसा नाही! पैसा होता! जुनी झाली कहानी
मानूस आहे! मानूस जगविन! हीच साईवाणी

तो फकीर होता, फिकीर नव्हती तरी होता बादशहा
तो जाणत होता, जखमा साऱ्या दुनियेचा शहेनशहा

जाणुनी घ्यावे दुःख दुसऱ्यांचे हीच खरी सेवा
श्रद्धेसाठी सबुरीची ज्योत मनी सतत तेवत ठेवा

**— श्री. जगदीश देवपुरकर**
कविता प्रकाशन,
मीशन कंपौंड, मोगलाई,
साकी रोड, धुळे-४२४ ००१.

★★★★★★★

# नको दाखवू आभास

बाबा तुमच्या चरणी जीव हा विसावला।
त्यावेळी संसाराची सुख दुःखे विसरला।
तुमच्या चरण स्पर्शाने क्रोधाग्नि निवाला।
पावन उदी भक्षणाने रोग निघून गेला।।

बाबा तुम्ही आमुचे रक्षण करता।
संकटातूनी आम्हाला वेळीच बाहेर काढता।
कृपादृष्टी ठेवून आमचा उद्धार करता।
मग का नाही मला तुमच्या चरणांपाशी नेता?

तुमच्यासाठी झाला माझा जीव कासावीस।
वाटे करावा तुमच्या चरणी रहिवास।
तुमच्या चरणाची बनू पहात आहे दास।
देवा, पुरव माझी आस, नको दाखवू आभास।।

**— सौ. शीला सदाशिव वाघ**
२/४, सरस्वती बाग,
जोगेश्वरी (पूर्व), मुंबई-४०० ०६०.

# तुझेच साई सगळे करणे

घडणारे जे, ते ते घडणे
चांगले वाईट, अथवा बरवे
तुझेच साई सगळे करणे
तुलाच सारे सारे ठावे.

'तूची कर्ता आणि करविता'
बिंबले असूनी अमुच्या चित्ता
क्षणोक्षणींच्या सुखदुःखाची
करीत बसतो फुकाच चिंता.

मृत्यू ठरतो जन्मा येता
बदलणे प्राक्तन नाही हाता
'साईनाम' ते आंतूनी घेतां
सुसह्य होई, भवसागर तरता.

— **श्री. विजय द. हजारे** एम.ए.
सी/६, गुंफा दर्शन, फर्स्ट कार्टर रोड,
बोरिवली (पूर्व), मुंबई-४०० ०६६.

# भावना

॥ आनंदाने बाबा वाहते तव पुष्प चरणी ॥
॥ नको ठेऊ भाव दुजा मणी ॥
॥ अपराध माझे पदरी घेई ॥
॥ धन्य ति द्वारकामाई ॥
॥ असे दूर मि तुज-पासूनी ॥
॥ आठवणीने गंगा जमुना वाहती ॥
॥ अधीर माझे प्राण झाले ॥
॥ तुझे दर्शन घ्यावया ॥
॥ तुझ्या प्रितीचे गीत लिहूनी ॥
॥ धन्य झाले मी साईबाबा ॥

— **सौ. सुधा विजय कदम**
इन्कमटॅक्स कॉलनी,
सेक्टर 'बि', रु.नं. २२७,
भांडूप (पूर्व), मुंबई-७८.

# पणाला माझी लागली आन!

पणाला माझी लागली आन।
साईनाथ! दे आता अवधान ॥ धृ ॥

आरंभी आवडीने घेई। नाम तुझे ते मंगलदायी ॥
विश्वशक्तीला करूनि आवाहन मांडियले अनुष्ठान ॥ १ ॥

दिसू लागले डोळ्यापुढे ते माझे मला मरण।
ना भ्यालो मी लवहित्याने आलो तुला शरण ॥
तुझेच मजला असे निरंतर एकच अनुसंधान ॥ २ ॥

टकमक बघती नर्तन माझे सात लाख डोळे।
तारेपर परि एकटाच मी दोनच मम डोळे ॥
तेहि खिळले ध्येय बिंदूवर, सावर मम अवसान ॥ ३ ॥

वेळेवर नच आला जर तू।
'नागेशाची' होईल छीः थू ॥
म्हणतील मज ते उपहासाने ''कुठे तुझा भगवान'' ॥ ४ ॥

**— श्री. नागेश मोगलाईकर**
'नागलक्ष्मी', २८२०, ग. नं. ४,
धुळे-४२४ ००१.

# श्री बाबांचे आगमन

कसे पातले हे बाबा शिरडी ग्रामात
वेष पाहता तयांचा भासती अनाथ ॥ धृ० ॥
असे माय बाप कोण कुठे जन्म यांचा
भिक्षा मागुनिया खातो नाथ शिरडीचा ॥ १ ॥
नसे जाती धर्म यांना गण गोत काही
अन्य जातीचा मेळावा सम दृष्टी पाही ॥ २ ॥
नित्य शिजवितो हंडी नामी ती खिचडी
प्रसाद हा सेवितांना वाटे अमृताची गोडी ॥ ३ ॥
जमला हा शिष्य मेळा पाहण्या बाबाला
साई नाम ठेऊनीया जय जयकार केला ॥ ४ ॥

**— श्रीमती रुख्मिणी बेंद्रे**
के.सी. चौधरी यांचे घर,
शारदा नगर, भुसावळ, जि. जळगाव.

# तो दिसला परमेश्वर शिर्डीला!

दीन बंधू, करुणाघन अवधुत।
फकिर वेषी सजला.... ॥
तो दिसला परमेश्वर शिर्डीला ॥ धृ ॥

निर्गुण निर्विकार जो म्हणती।
योगी मुनी ज्या सदैव ध्याती.... ॥
अणुरेणुनं जो व्यापीहि सृष्टी।
दृष्टीत चिरंतन जाहला ॥ १।

विविध रुपानी अजुनहि प्रगटे।
प्रिय भक्तांना प्रचिती येते... ॥
निज सामर्थ्ये आव्हानहि देते।
एकादश वचनी मनुजाला... ॥ २ ॥

कणकण शिर्डी झाली सुवर्णी।
अलके सम बाबांचे चरणी ॥
श्रद्धा-सबुरीत उसळे पर्वणी।
प्रतीदिन परमार्थाला... ॥ ३ ॥

**— श्री. बाळासाहेब शांताराम नाडकर्णी**
सी/१४११, लक्ष्मीपूरी,
कोल्हापूर.

# करावे नेत्र हे माझे दान

**[चाल : असावे अपुले घरटे छान]**

करावे नेत्र हे माझे दान
मनी असावा भाव साईचा
गोड मुखामध्ये साई नामाचा
चित्ती असावा साई माझा
त्यास अर्पिन माझा डोळा

**— सौ. विजयालक्ष्मी पी. चौगुले**
सी-२४, फर्स्ट क्रॉस,
आठवा मुख्य रस्ता,
वसंत नगर, बेंगळूर-५२.

# साई एक मनी

साई एक मनी साई एक ध्यानी
साई एक सार अवघे भुवनी ॥ १ ॥

साईच्या नामे अवघी शक्ति
देही लोटे परि प्रकटे चैतन्यी ॥ २ ॥

साई नाम गोड अमृता अजोड
मन होई शांत भक्तिभाव-भजनी ॥ ३ ॥

साई नाम स्नान पापांचे क्षालन
अखंडचि भजता साई गीत गानी ॥ ४ ॥

साईसी संवाद सत्वशील हृदयी
नित्य कर्मे थोर साई होय मानी ॥ ५ ॥

— **श्री. अजित म. पावसकर**
जे. १८/२, स.गो. बर्वे नगर,
घाटकोपर, मुंबई-४०० ०८४.

# शिरडीला जाऊ

चला सारे शिरडीला जाऊ
डोळे भरूनी साईला पाहू
साई भक्ती करिता अपार
संकटे जातील पळूनी दूर
नाथांची गीते आपण गाऊ ॥ १ ॥

मिळते तेथे प्रसाद विभूती
आरोग्य सुखाची होईल प्राप्ती
जीवनांत आनंद मिळवूं ॥ २ ॥

चला नाथांची शिरडी आली
साई भेटीची ओढ लागली
संत चरणी मस्तक ठेऊ
डोळे भरूनी साईला पाहूं ॥ ३ ॥

— **सौ. आशालता कालिदास भालेराव**
दत्तमंदिर वाडा, मु. पो. ता. नवापूर,
जि. धुळे.

# श्री हरी

शिरडीच्या द्वारी संगे श्री हरी।
नाही कोणी दुजा मम जिव्हाळ्याचा ।। धृ ।।
तन मन धन अर्पूनिया सारे।
मज काही कमी नाही कधीरें ।। १ ।।
शिरडीचा संत गोरगरीबांचा।
कैवारी तो दुबळ्या मनाचा ।। २ ।।
चुकल्यास दावी मार्ग जीवनाचा।
माता दुःखीयाचा साई शिरडीचा ।। ३ ।।

**— सौ. मिना बि. सावंत**
लालबाग, मुं.नं. १२.

# साई गौरव

कोटी कोटी जन आम्ही -गातो, साई गौरव गाथा
साईचरणी आज नमवितो विनम्र हा माथा।
भक्तिमार्ग दावूनी आम्हाला
अध्यात्म मंदिरी प्रवेश दिधला
लुटले तेथील धन जरी सारे, अक्षय तो साठा। कोटी-----
साईकृपेची होता वृष्टी
मार्ग सापडे गहन तिमिरी
साई चालवी हाती धरूनी, अपुल्या भक्तांना। कोटी----
साई आहे तृप्ती दाता
साई आहे मुक्तिदाता
साईच अवघ्या विश्वाचा ह्या एकमेव त्राता। कोटी-----
वृक्ष एक त्याच्या विविध शाखा
असे जगाचे स्वरूप जाणा
परस्परातील प्रेम वाढवा, शिकवी सकलांना। कोटी---
तिमिर हरपूनी प्रकाश येई
उज्ज्वल अवघे जीवन होई
प्रकाशदाता साई भासतो, सूर्य जणू दूजा। कोटी---

**— सौ. कांचन चुरी**
४, कमलाक्षी निकेतन,
दिलीप गुप्ते रोड,
माहिम, मुंबई - ४०० ०१६.



# साईनाथ साईनाथ

साईनाथ, साईनाथ। तूंचि अम्हा माय-तात।
तूंच एक आसरा, भाविकांस या जगांत ॥ धृ ॥

कृपाळू तू, दयाळु तू, प्रति पाळिसि भक्तजनां।
सुजनांसि सुखी करिसि, दंडुनियां दुष्ट जनां।
"श्रद्धा अन् सबुरि" हि रुजविली तुवां मनांत ॥ १ ॥

समता अन् बंधुभाव, सर्व जनां शिकविली।
उच्चनीच, लहान-थोर भावना हि निरसिली।
भेदभाव नच उरला शिरडीच्या प्रांगणात ॥ २ ॥

हिंदु असो वा मुस्लिम, कुठली हि जात धर्म।
येतां तव पायरिसी, बनतो, तो भक्त परम।
भावें जे भजति तुला, पावसि तूं तयां क्षणात ॥ ३ ॥

माळरान शिरडीचें, केलेस तू नंदन-वन।
धन्य होति यात्रिक ते शिरडी ही तुझी बघून।
विसरुनियां मी, तू, पण होई मन शांत शांत ॥ ४ ॥

असोनियां सर्वेश्वर, होऊनि राहिलास फकिर।
दावाया भक्त-जनां संसार चि हा असार।
शिकवणिनें तुझ्याच या वासना नु रे मनात ॥ ५ ॥

**— श्री. द्वारकानाथ साबजी प्रभू दाभोलकर**
५१/६, ॐ साईनाथ को.हॉ. सोसायटी,
सांताक्रुझ (प.), मुंबई - ४०० ०५४.

# क्षमा करा मजवर तूं साईबाबा

माझी लाज तुज हाती सदा साईबाबा ।
माझ्या उद्धारासाठी धांव तूं साईबाबा ॥
मी पामर तुज चरणी सदा साईबाबा ।
इतुके श्रवूणी दया करा मजवरी तूं साईबाबा ॥
बंदा तुझा झालो मी जरी साईबाबा ।
क्षमा करा मजवर तूं साईबाबा ॥

**— श्री. भाईशंकर डी. मायतुरा**
१७, पारसीवाडा मार्ग क्र. २,
पहिला मजला, व्ही.पी. रोड,
गिरगाव, मुंबई-४००००४.

# दिसला मोक्षाचा शिशा

साई असती दया अन् मायेचे सागर
"श्रद्धासबुरी" मंत्र लाटा शोभती कश्या त्यावर
भक्ताच्या भिडती येऊन त्या हृदय किनारी
सांगा अशा महान साईंची कोण करील बरोबरी
बाबांच्या प्रेमळ उदरी लोपले अनंत भक्त शिंपले
साई सेवेमधे होते ते कसे सुबक कोंदले
निरे सम निर्मळ बनले नावाडी साईनाथ
निरस संसार नावेला बुडता दिला त्यांनी हात
लिलेच्या वायु शिडेने फडफडली चारी कक्षा
अनुभवाच्या झऱ्याने उतरवली धुंदीची नक्षा
षड्रिपुंच्या चक्री वादळाने चुकली होती आयुदिशा
उतरता कसोटीला दिसला त्यासी मोक्षाचा शिशा

**— सौ. वसुंधरा रामराव चोरे**
८०३ सी, लक्ष्मी भुवन,
डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुं - १४.

# मनाची आंस

साईनाम मनीं गुणगुणीन
काया, वाचा, तुज ओवाळीन
शिर्डीला कधीं मी जाईन?
हिच आंस मनीं रात्रंदीन
बाबांना पाहिन मी डोळा
मग मिळे माझ्या मनां विरंगुळा
नाथांच्या नामाची जगभर ख्याती
घरोघरी चाले बाबांची महती
साईनाम मुखी म्हणा
चला नाथांच्या दर्शना
कृपा असुद्या मजवरती
हिच तुला माझी विनंती

**— सौ. सुधा न. गानला**
डॉ. आकुला वाडी,
१०, लक्ष्मीनारायण लेन, माटुंगा-१९.

# साईनाथ मंत्र जपत हिंड तू जगात

साईनाथ मंत्र जपत हिंड तू जगात
कर्मयोगी ज्ञानाचा ध्वज तुझ्या वुरात ॥ धृ० ॥

साईचे रम्य जगत भोवती पसरले
प्रीतीचे मंगलमय रुप आगळे
प्रीती मधे प्रीत भरूनी हिंड तू जगात ॥ १ ॥

हसऱ्या या नंदनवनी मोह नांदतो
कणकण भगवंत बघूनी लहर लहरतो
लहरीत त्या निरखित साई हिंड तू जगात ॥ २ ॥

लपून नाही साई उघडा जगती राहतो
निर्माता, संचालक, साधक, गती तो
पकडूनी ती अचूक गती हिंड तू जगात ॥ ३ ॥

डोळ्यावर पटल चढे मी पणांतले
अंधत्वा वरूनी लोक विसरती भले
अंजन त्या नयनी भरत हिंड तू जगात ॥ ४ ॥

पसरूनी बाहूस पुढे साई तिष्ठतो
भक्तिच्या अंगणात तोच भेटतो
दाखवित अंगण तू हिंड तू जगात ॥ ५ ॥

— **कु. निलम नारायण दोशी**
मु.पो. निजामपूर, ता. माणगांव,
जि. रायगड.

◆◆◆◆◆

# साई तुझे नाम

साई तुझे नाम, धीर देई मना
गोड तुझे रूप, सुख होई नैना ॥
तुझे गुणगान साई, तृप्ती देती काना
आतुरले मन माझे, तुझ्या रे दर्शना ॥

— **सौ. मंदा इनामदार**
स्नेहसागर अपार्टमेंट,
प्रभादेवी, मुंबई-२५.

## साईभक्ती

शिर्डीचा तो साईनाथ
दीन दुबळ्याला देई साथ
तुजविण नाही कोणा साथ
म्हणूनी जन म्हणती साईनाथ ॥ १ ॥
तुझी गाऊ अपार किर्ती
हृदयात साठवू सतत मूर्ती
नित्य स्मरावी तुझी आरती
साई नामे येई स्फूर्ती ॥ २ ॥
शिर्डी आम्हा पंढरपूर
अवघे वसले काशी-रामेश्वर
शिर्डीचा तो साई ईश्वर
धाव ऐकोनी येती तत्पर ॥ ३ ॥
अहंकाराची बेडी तोडा
साई नामे प्रिती जोडा
द्वेष-मत्सर अवघे सोडा
साई चरणी भक्ती जोडा ॥ ४ ॥
फटकूनी रहावे अहंकाराशी
सोडूनी द्यावे गर्वाशी
नित्य स्मरावे साईशी
बेबी झाली वेडीपिशी ॥ ५ ॥

**कु. बेबी पां. केशवशेट्टी**
इंदिरा गांधी चौक,
तुमर्गा (उमरगा), जि. उस्मानाबाद.

## कृपा कर श्री साई मजवर

कृपा कर श्री साई मजवर ॥
तूच माझा आधार।
श्रद्धा आहे तुजवर।
करशील दया मजवर।
अशीच थोर लिला जगावर।
पाहूनी मज वाटे नवल।
तूच दया, मायेचा सागर।
दे मज सखोल सहारा।
हे मायेच्या अनंत सागरा।
दावशील मज तू दर्शन।
तू माझा पिता तू माझी माता।
कृपा कर श्री साई मजवर ॥
श्रद्धा आहे तुजवर।
साई-साई मज मुखावर।
सुख वाढे अनावर।
ऐशी अघोर लिला जगावर।
दावशील मज याच क्षणी।
कृपा कर श्री साई मजवर ॥
सदा वसे हृदयी माझे।
भय न मज उरले कसले।
कृपा कर श्री साई मजवर ॥
श्रद्धा आहे तुजवर
कृपा कर......

**— श्री. राजेंद्र गवळी**
लेखा शाखा विभाग,
श्री साईबाबा संस्थान, शिरडी.

# पाऊले चालती शिरडीची ही वाट

पाऊले चालती शिरडीची ही वाट
सुखी संसाराचे सोडूनिया पाश
नको देऊ मजला संसार अभिलाषा
नको पाडू पदरी माझ्या ही निराशा
पाऊले चालती....

मन माझे राहो निरंतर ठायी
तुजविण साई मज कोण पाही
पाऊले चालती....

तूच माता पिता अन् तूच दाता
तुजविण तारेल मज कोण अनाथा
पाऊले चालती....

तळमळतो जीव माझा साई तुझ्या दर्शना
नित्य वाटे शिरडीत यावे तुझ्या दर्शना
पाऊले चालती शिरडीची ही वाट
सुखी संसाराचे सोडूनिया पाश

**— रोहिणी शंकर जाधव**
जुना मुंबई रस्ता, मिलका कॉलेज,
समर्थ सोसायटी समोर,
ठाणे.

# शिर्डीलाच जायचं आहे

कुणाची इच्छा कशाची आहे
मला इच्छा साईंची आहे।
आईला इच्छा बाळाची आहे
ओढ मला शिर्डीची आहे ॥ १ ॥

इच्छा माझी गायची आहे
आरती साईनाथांची आहे।
पूर्वीची माझी पुण्याई आहे
संगती माझी द्वारकाई आहे ॥ २ ॥

कुणाला कसली इच्छा आहे
पंढरीला कुणाला जायचं आहे।
काशीला कुणाला जायचं आहे
मला मात्र शिर्डीलाच जायचं आहे ॥ ३ ॥

**— श्री मोहन एस. सोनवणे**
अध्यक्ष, साहित्य सौरभ,
मु.पो. नवागांव, ता. नवापूर, जि. धुळे.

# सर्वसाक्षी साई तू


साई तू दीनांचा
साई तू हीनांचा
गोरगरिबांचा
साई देव तू ॥ १ ॥

साई अनाथांचा
साई पतितांचा
साई सकलांचा
कैवारी तू ॥ २ ॥

साई विश्वाचा पिता
साई विश्वाची माता
साई भक्तांचा त्राता
करुणाकर साई तू ॥ ३ ॥

साई भक्तांची माऊली
साई कृपेची सावली
साई वसे जळी स्थळी
सर्वसाक्षी साई तू ॥ ४ ॥

— श्री. द. रा. तळेकर
जे-९, मुकेश मिल कंपाऊन्ड,
ना. आ. सावंत रोड,
कुलाबा, मुंबई-५.



# "श्रीसाईलीला"

श्री साई सच्चिदानंद
आनंदाचा कंद ॥ धृ० ॥

संतामध्यें शोभे साई
शिरोमणी संत ॥ १ ॥

कैवल्याचा मनाला
लागलाय छंद ॥ २ ॥

गमे मज साई
साठा मकरंद ॥ ३ ॥

जपी साई साई
होई ब्रह्मानंद ॥ ४ ॥

दर्शनें साईरायाच्या
होतो परमानंद ॥ ५ ॥

"द्वारका माई" माजी
जळे धुनी अखंड ॥ ६ ॥

उदी रुपी संजीवनी
देई पीडीतास आनंद ॥ ७ ॥


कीर्ति साईरायाची
गाजे त्रिखंड ॥ ८ ॥

अवघड दानी साई
मति करी गुंग ॥ ९ ॥

कृपा प्रसादे भरी
जीवनांत रंग ॥ १० ॥

साईरायाच्या जपयज्ञी
"मधु" आहे दंग ॥ ११ ॥

— सौ. मधु गायकवाड
सी-५/२८/१/३,
सिडको कॉलनी,
नविन पनवेल.



## मागणे

मागणे हे माझे, तुजकडे साईनाथ
सतत घडावा तुझा सहवास

विसर न पडावा कधीही सुखात
दुःख प्रसंगी असावी तुझी साथ

पाहतो तुला माय कासवी रुपात
तुझी पिल्ले आम्ही वाढू तुझ्या कृपेत


घरी येऊ देत सदैव साईभक्त
साईप्रेमी आणि साधुसंत

व्हावे आम्हांकडून त्यांचे स्वागत
साईभक्ती होवो वृद्धिंगत

घडावी साईसेवा मुखी नाम सतत
रहावे तन मन तुझ्यामध्ये रत

नको आम्हा धनं, नको आम्हां सोनं
लाभावे आम्हा तुझे आशीर्वचन!

**— सौ. भावना जेऊरकर**
डोंबिवली (पश्चिम).





## साई माऊली

माझी साई माऊली
कल्पवृक्षाची साऊली ॥ धृ ॥

संकट समयी धाऊनि येसी
धीर दिलासा भक्तां देसी
तव कृपा छत्रां खाली
माया ममता लाभली ॥ १ ॥

उदी प्रसाद प्राशन करिता
दुःख दैन्य जाती विलया
तुझ्या नामाची थोरवी
गाता तहान भूक हरली ॥ २ ॥

श्रद्धा सबुरी शिकवण देऊनि
एकची ईश्वर सर्वस्वांतुनि
शब्द सुमने गुंफुनि
लीला साईंची गायिली ॥ ३ ॥

**— श्री. चंद्रकांत श्रीराम गरगटे**
३९९, गुरुवार पेठ,
सातारा-४१५ ००२.

# बाबांजवळ मागणे

शिर्डी माझे माहेर घर
वसे गोदातीरावर
माझे बाप आणि आई
शिरडीचे ते बाबासाई
माझे माहेर श्रीमंत
तेथें पैशांची खैरात
तेथें नाही कसली वाण
जणूं सोन्याचीच खाण
साई पाहे सर्वांनाही
तेथें भेदभाव नाही
साई पावती नवसास
जैसा ज्याचा दृढ विश्वास
श्रद्धा दृढ धरा मनी
पहा प्रचिती घेवूनी
शरीरानें मीं अधू जाहले
माहेर मजसी अंतरले
माझे बाबा दर्शन देतील
माझ्या सदनी तेच येतील
बाबा असू द्या हस्त मजवरी
करा लेकीची इच्छा पूरी

**— सौ. सरोजिनी मुळये**
इंदूर.

# साई गीत

शिरडीच्या साईबाबा
आले केवळ भेटीसाठी
मनी येईल तेव्हा भेट देरे
जगजेठी ॥

नको मला धन नको लौकिक
सन्मान मुखी राम नाम सदा वसो ॥

रान नवमीला उत्सव होतो मोठा
तेथे कशाला नाही तोटा। रामनामाचा
आनंद लुटीती एकामेका ॥

दर्शनासाठी तेथे धर्म जात नाही।
मन साईमय होई। संसाराची
सुखदुःखे मग विसरून जाई ॥

धूप दिपाची आवड साई तुला भारी
भक्ताला भेटविला पंढरीचा हरी ॥


सारा परिसर झाला पावन तूझ्या पायी
कधी भेटशी मला साई ॥

नैवेद्याला तुला खडीसाखरेची गोडी
गरिबाची तुला चणे चुरमुऱ्याची थोडी पुडी ॥

आवडते तुला कांदा भाकर
वर लोणी। कृष्ण विष्णू ईश
सारे एकाच चक्रपाणी ॥

काव्य माझे घेरे सारे तूं
मानून पुष्प वाहते तुझ्या
पायी नेत्र येती रे भरून ॥

**— कमल बी. मुळये**
डोंबिवली.



# साई येती घरा

साईनाथ स्मरा। साईनाथ स्मरा।
नमो भावे गुरु दत्त दिगंबरा ॥ धृ ॥
दया करी साई शांती मना देई।
साईनाथ करी नित्य घरी फेरा ॥ १ ॥
दीना साई तारी हात त्याचा धरी।
घडे तीच वारी ध्यास तोच धरा ॥ २ ॥
जरी शिरडी दूरी धाव तीच खरी।
नाथ साई तारी नाव लावी तिरा ॥ ३ ॥
अनाथाचा नाथ हाच साईनाथ।
दावितसे पथ मार्ग चुकता जरा ॥ ४ ॥
धरा तीच कास पुरवीतसे आस।
लाभे सहवास मिळे तो आसरा ॥ ५ ॥
भाग्य ज्याचे खरे चुकती त्याचे फेरे।
उघडी तीच दारे जाई दरबारा ॥ ६ ॥
मोक्षाचे ते धाम मुखी साईनाम।
हाच नित्य नेम चरण तेच धरा ॥ ७ ॥
विनवितो दास सख्या साईनाथा।
विनम्र हा माथा चुकवा वेरझारा ॥ ८ ॥

— श्री. स. मा. मुन्हार
कार्टर क्र. १२३, चंदननगर,
कामगार कल्याण केंद्राजवळ, नागपूर.



# श्री साई समर्थ

तुझ्या भक्तीची अन् तुझ्या प्रितीची ।
मजला लागली आस साई ॥ १ ॥
जीवन माझे तुला वाहीले ।
भक्तीने मन तुला अर्पिले ॥ २ ॥
सदैव माझ्या हृदयी राहूं दे ।
नाम तुझे रे साईनाथा ॥ ३ ॥
न लगे मजला वैभव सारे ।
तुझ्या भक्तीची उघडूं दे दारे ॥ ४ ॥
यातच मजला सर्व मिळाले ।
जीवन माझे सार्थकी जाहले ॥ ५ ॥
सदैव तुझी मूर्ती राहूं दे ।
निशिदिनी माझ्या दृष्टीपूढे रे ॥ ६ ॥
हीच विनंती तुझ्या चरणी ।
साईनाथा राहूं दे तुझ्या स्मरणी ॥ ७ ॥

— श्री. अंकुश रामचंद्र सुर्वे
२/५, चित्तरंजन नगर,
राजावाडी, घाटकोपर,
मुंबई-४०० ०७७.

# सर्वस्व

संकटकाळी तूच धावतो
का म्हणू मी निराधार?
बाबा तूच मम आधार ।।१।।

तूच माझी कृष्णमूर्ती
तूच माझी दिव्यस्फूर्ती
तूच माझे स्वप्न बाबा
तूच माझी प्राणज्योती ।।२।।

दुःख तुला मी वाहीते
सुख मी तुला मागते
तूच माझे प्रेरणा
सहनशक्ती समजते ।।३।।

सदा असू दे चित्त स्थिर
तव चरणी
झुकणे, नसू दे स्वार्थापायी
दुजी न माझी मागणी ।।४।।

**— डॉ.सौ. मालती राहाटे**
मेडीकल ऑफीसर,
डागा स्मृती रुग्णालय,
नागपूर.

# साई भगवान

**[अहिराणी कविता]**

उंडारना वारा वारा
जेठ आखाडमा
पडे पानीन्या धारा
शिरडी गावमा ।।

आमी जातस जत्राले
पानी उघडेना
वारा वाजे त्या पखाले
कोनज डोकेना ।।

तुन्हा साई दर्सनले
उभ्या आया बाया
माथा टेकी पायरीले
धन्य आत्मा झाया ।।

सखी करे कट कट
जल्दी जावाना
माले झाय अवघड
शिरडी राव्हाना ।।

लीला म्हने वन वन
नको करू बायी
साई मन्हा भगवान
शिरडीमा ऱ्हायी ।।

**— सौ. लीला मराठे**
धुळे.

**टिप :-** उंडारना=उंडारलेला, जेठ=जेष्ठ, आखाडना=आषाढातला, पानीन्या=पाण्याचा, आमी=आम्ही, जातस=जातोय, वाणे=वाजतो, पखाले=मृदंग, कोनज=कोणाचच, तुन्हा=तुझ्या, दर्सनले=दर्शनाला, झाया=झाला, जल्दी जावाना=लौकर जाण्याचे, राव्हाना=रहाणे, म्हने=म्हणे, मन्हा=माझा, ऱ्हायी=रहातो.



# रुप तुझे पाहता साई

रुप तुझे पाहता साई
तहान भुक मी विसरून जाई ॥

तुझ्या दर्शनाने तृप्त होई
मन माझे नित्य समयी ॥

तूच माझे बाबा आई
तूच माझे सर्व काही ॥

जो जो तुझे नाम घेई
जगी त्यास भिती नाही ॥

जो जो येई तुझ्या पायी
दुःख त्याचे निघून जाई ॥

भक्त तुझे पडता संकटी
धरीसी तू त्यांना आपुल्या पोटी ॥

मागणे बाबा आता एकच
आशीर्वाद असावा असाच नित्य ॥

एवढीच मागणी आहे फक्त
हट्ट धरी तुझा हा भक्त ॥

— श्री. एम.एन. खटावकर
१६९, पहिली गल्ली,
गांधी नगर,
बेळगांव





# श्री साईंच्या चरणी

साई साई म्हणोनी
करू अखंड गजर
साई तुझी आंम्हावरी
अशी राहू दे नजर!

साई दृढ चित्ती
असू द्यावे सदा
प्रेमाचा तो पान्हा
राहू दे सर्वदा!

साई तूज वंदोनी
करितो मी नमन
चित्ती असू द्यावे
आंम्हा समाधान!

कृपा दृष्टी साई
करी तू आम्हासी
हेची एक मागणे
नमूनी तुझ्याशी!

— श्री. अशोक पाटील
मुळानगर, बी १४/२,
राहुरी, कृषि विद्यापीठ.

## साई साई गोविंद सगळे

मी मी म्हणतो माझे माझे
व्यर्थ ओझे वाहतो सारे
सुखाचे सोबती असती सारे
कसे समजावू तुज सांग रे
माझे माझे का वदतो
सांग वेड्यामाये मधे बद्ध होतो
ईश्वराचा खेळ चाले
मानव कोळी जाळे विणे
मी मी म्हणतो माझे माझे
व्यर्थ ओझे वाहतो सारे
आशा पाशे ओठावलास
मृगजळा मागे धावला
उनपावसाचा खेळ चाले
ईश्वर निर्मित सारे आहे
म्हणूनि म्हणतो त्यज हे सारे
कृष्णार्पन कर सगळे
मग साई साई गोविंद सगळे.

— **सौ. कलावती चव्हाण**
डोंबिवली.

## जय साईनाथा

जय साईनाथा, श्री साईनाथा।
सदा सुयश पदरी तव कृपेने,
आनंदी आनंद झाला चोहिकडे,
साष्टांग नमन घातिले तव चरणांवर,
जय साईनाथा, श्री साईनाथा ॥ १ ॥

जय साईनाथा, श्री साईनाथा।
चोही दिशांना आमुचे साईबाबा,
सदा हस्त मदतीचा संकटकाळी,
नेती सर्वांना साई सन्मार्गावर,
जय साईनाथा, श्री साईनाथा ॥ २ ॥

जय साईनाथा, श्री साईनाथा।
हे नमन तुज श्री साईनाथा,
होतो प्रसन्न भक्त तव कृपेने,
सदा करुणा साईंची भक्तांवर,
जय साईनाथा, श्री साईनाथा ॥ ३ ॥

जय साईनाथा, श्री साईनाथा।
बाबांची कृपा सदा भक्तांवरी,
भक्तांची भक्ति असे बाबांवरी,
साईनामाचा ओंकार चोहिकडे,
जय साईनाथा, श्री साईनाथा ॥ ४ ॥

जय साईनाथा, श्री साईनाथा।
सहृदय आमुचे साईबाबा,
त्यांना वंदन करू भक्तजनांनो,
देती आश्रय अनाथा साईनाथ,
जय साईनाथा, श्री साईनाथा ॥ ५ ॥

— **कुमारी वैशाली विजय मिरगळ**
३, 'यमुना सदन', विष्णुनगर,
नौपाडा, ठाणे.

# साईबाबा तुम्हांस...!

बाळ माझा पुजितो,
साईबाबा तुम्हांस,
पात्र होऊ दे,
चांगल्या गुणांस.
बाळ माझा करितो,
तुम्हांस नमस्कार.
होऊ दे त्याला,
जीवनाचा साक्षात्कार.
बाळ माझा घालीतो,
तुम्हांस प्रदक्षिणा.
लागो त्याचे मन,
सदैव सुज्ञाना.
बाळ माझा आठवितो,
तव नामाचा जप.
न्याहळावे त्यांनी,
माणुसकीचे रूप.

**— श्री. सादिक शेख**
मु. सिंधुदूर्ग किल्ला,
पो. मालवण, जि. सिंधुदूर्ग.

# मनोगत माझ्या मनाशी

सांग माझ्या मना, कोण रे आहे तुझा?
— साई माझा या जगात, साई माझ्या ह्रदयात.
सांग माझ्या मना, कोण रे तुला बघतो?
— साई मला दिसतो, आणि तो मला बघतो.
सांग माझ्या मना, कां रे तू हसतोस?
— बोलावतो साई मला शिरडीस, म्हणूनी मी हसतो.
सांग माझ्या मना, कां रे तू रडतोस?
— जगाची दुःखे पाहूनी, साईची आठवण मी करतो.
सांग माझ्या मना, आहे काय रे तुझी अपेक्षा?
— न व्हावी या जगी, कोणाची कधी ती उपेक्षा
सांग माझ्या मना, का रे होतोस असा अधीर?
— वेळ आहे साईच्या पुजेची, आणि बघ झाला उशीर.
सांग माझ्या मना, काय रे बघतोस जगाच्या वनात?
— साई माझी माऊली, आणि मी तिची साऊली.
मनारे मना, रित तुझी न्यारी, वाटते असावी
साई मुर्ती तुला अती प्यारी?
साईच्या वेड्यांना काय दुसरे हवे? साई असेल जेथे
पळत तेथे जावे, चरणी त्याच्या बसावे,
चरण कमळ त्याचे ते धुवावे.

**— श्री. ताराचंद न. चव्हाण**
'साईछाया', एच्-३, साबर फ्लॅटस्,
पालडी, नारायण नगर रोड,
अहमदाबाद-३८० ००७ (गुजराथ).

# दारि आलो तुझ्या साईनाथा

दारि आलो तुझ्या साईनाथा!
तार वा मार तू या पतीता ।। धृ ।।
शैशवाची हवा पावसाळी
यौवनाची नशा तर हिवाळी
प्रौढ पर्वात उष्मा उन्हाळी
वासनेची तरी ओढ चित्ता ।। १ ।।
पाप कर्मात आयुष्य गेले
देवधर्माचे थोतांड रचिले
साधुसंतांचे अपमान केले
मीच माझा असा घातकर्ता ।। २ ।।
देह पोटापुरेशी शिदोरी
पांघरा या, निजेला पथारी
हाति घेऊनिया एकतारी
गात राहिन तुझी नामगाथा ।। ३ ।।
व्यर्थ मोहातली फौजदारी
स्वार्थ साधू असा मी भिकारी
जीवनाचीच आली शिसारी
मुक्ति शिरडीत द्यावी अनंता ।। ४ ।।

**— श्री. मनोहर म. धुमाळ**
डी/३२, खो.नं. ०११, गोकुळधाम,
गोरेगाव (पू.), मुंबई-४०० ०६३.



# सबका मालिक...

साई... तू सकळांचा त्राता
अजाण आम्ही तुझी लेकरे
तूच पिता अन् माता... साई
तू सकळांचा त्राता.

आम्हा लागली ओढ सुखाची
तयात बीजें जरी दुखाची
कळते आम्हा परी न वळते
तूच तारिसी आता... साई
तू सकळांचा त्राता.

काम, क्रोध अन् मदमत्सर हे
आम्हा वाटती आज सोयरे
भवसागरी या आम्ही बुडालो
दे साई तू हाता... साई
तू सकळांचा त्राता.

तूच कर्ता आणि करविता
भोग सरती तुजशी स्मरता
सबका मालिक म्हणती तुजला
तूच अलौकिक दाता..., साई
तू सकळांचा त्राता.

**— श्री. भाऊ शिगवण**
ए/२, १२ जयराज अपार्टमेंन्ट,
वझीरा नाका, बोरिवली (प.)-९२.

## साईश्वर माझा त्राता

निराशमय जीवनी 'त्या'
    संकटाच्या वेळी 'त्या'
तारिले मज अभाग्या
    शिरडीपती साईने 'त्या' ॥ १ ॥

दुःखी नी एकाकी काळी
    नाही कुणीच मदत केली
परि बाबानी कृपा केली
    होऊनी माझा वाली ॥ २ ॥

महती तुमची थोर देवा
    केलीत हयातीत सेवा
उदी-रूपे ही करिता सेवा
    भक्तजन देती दुवा ॥ ३ ॥

पाहता तव प्रेमळ लोचनी
    लाभे चैतन्य मम जिवनी
साई नाम राहो नित्य अतःस्करणी
    हेचि प्रार्थितो तुम्हा चरणी ॥ ४ ॥

— **श्री. प्रदिप श्रं. पिरणकर**
विर्नोडा, पेडणे गोवा,
४०३ ५१४.

## माफीचे साक्षीदार

पहाटे पासून झोपेपर्यंत
    त्रिकाळ आरत्या करून
तुझे सेवेकरी, नाना पूजा-अर्चा
    नैवेध-धूप-दीप दाखवतात
        दिवसभर —
तुझ्या जीव नसलेल्या
    देहावर समाधी रचून
सतरा वेळा नाक घासतात
    हात जोडतात, सारे
        पश्चातापाने —
त्यांच्या ह्या देखल्या देवा
    दंडवताला भुलून
मग तूंहि पावतोस
    माफ करतोस
        चुकलेल्यांना —
नि- हे माफीचे साक्षीदार
    तुझा महिमा गात
गाथा सांगत सुटतात
    इतरेजनांना आनंदाने
        चमत्काराच्या!

— **श्री. भालचंद्र केशव गन्द्रे**
सुख निवास, चेंदणी, ठाण.

# प्रेमाचे माहेर

सुन्दर ते ध्यान
शिरडीचे साई
पहा दरबारी
रुप मनोहर!

सुन्दर तो थाट
शिरडीचे गावी
पहा भक्ती फुलें
प्रेमाचे माहेर!

सुन्दर ते तेज
शिरडीचा साई
मानवांचा सन्त
हाच खरोखर!

सुन्दर ते प्रेम
साई माऊलीचे
बन्धु वात्सल्याचा
हाच शिर्डीश्वर!

**— श्री. प्रभाकर कोळमकर**
बी.ए.,बी.एड., एल.एल.बी.
गुंफा दर्शन, १ ला कार्टर रस्ता,
मुं.पो. बोरीवली (पूर्व).



# भगवान श्रीकृष्णाचा पाळणा

श्रावण मासी वद्य पक्षात,
तीथी अष्टमीला त्या गोकुळात,
रात्री बारा वाजेच्या सुमारास,
बाळकृष्णाचा अवतार होत,
जो बाळा जो जो रे जो जो ॥ १ ॥

आठव्या अवतारी मथूरेशी आला,
दुष्ट कंसाचा संहार केला,
मुक्त केले हो त्या देवकीला,
गोकुळामध्ये खेळ खेळीला,
जो बाळा जो जो रे जो जो ॥ २ ॥

दुष्ट जनांच्या संहारासाठी,
बाळकृष्ण आले हो जगजेठी,
धर्मरक्षण करण्यासाठी,
भगवद्‌गीता ही धर्माच्यासाठी,
जो बाळा जो जो रे जो जो ॥ ३ ॥

विविध प्रकारे दश अवतार,
देव लोकीते आहे मंजूर,
आठवा अवतार कृष्णाचा थोर,
वाटावी आता सुंठ-साखर,
जो बाळा जो जो रे जो जो ॥ ४ ॥

साई असे हो कृष्ण अवतार,
भक्त जनांचा एक आधार,
आनंदी आनंद होतसे फार,
पाळणा हलवी नटवरलाल,
जो बाळा जो जो रे जो जो ॥ ५ ॥

**— श्री. नटवरलाल विसपुते**
हार्मोनियम वादक,
श्री साईबाबा संस्थान शिर्डी.

# जेव्हां तूं येशील माझ्या द्वारी

साई, दिवाळी आली रे आली।
जेव्हां तूं येशिल माझ्या द्वारी ॥
पणत्या, लावूनी, करीन स्वागत।
लावूनी त्यांत, प्राणज्योती ॥
आली आली रे, दिवाळी आली।
जेव्हां, तूं येशिल, माझ्या द्वारी ॥ १ ॥

दिवे लागले, विश्वामध्ये।
ज्योति फुलल्या, शरिरामध्ये ॥
सुविचारांचा, फराळ केला।
तृप्त होती, बाबा सारे ॥
आली आली रे, दिवाळी आली।
जेव्हां, तूं येशील, माझ्या द्वारी ॥ २ ॥

प्रेम, दया, क्षमा, शांती।
घरामध्ये सांठवूनीं ठेविती ॥
काम, क्रोध, मद, मत्सर।
त्यांचा नाश, राक्षस करिती ॥
आली आली रे, दिवाळी आली।
जेव्हां, तू येशील, माझ्या द्वारी ॥ ३ ॥

**— सौ. कल्पना मंगेश कोरडे**
१८ काकडवाडी, ४ था मजला,
आर्य समाज समोर, गिरगाव, मुंबई-४००० ०४.

# लय लागते

मनात माझ्या दिसते मूर्ति एकांती साईंची
लाडकी लेकच मी त्यांची = धृ =
हार गुंफिता मीच तयांचा
साई साई वदते वाचा
लागते लय अशी नामाची = १ =
समोर दिसतो मार्ग शिरडीचा
मने चालते शीण न त्याचा
अशी या जादू नामाची = २ =

नेत्र लागले साई चरणी
रुप पाहते तेच लोचनी
कधी ना त्याला विसरायाची = ३ =
हात कृपेचा धरी मस्तकी
वरदान ते द्याया जणू की
अशी ही तऱ्हा फकिराची = ४ =

— श्री शहाणे
लक्ष्मी-निवास, गडकरी रोड,
डोंबिवली (पूर्व).

*****

# साईराया माझ्या बंधुराया

[चालः- फेऱ्यातील गाण्याची]

साईराया रे साईराया, माझ्या बंधुराया।
अशी असू दे सर्वांवरती तुझी माया ।। धृ ।।
श्रावण भाद्रपदात येती सणांचे लोंढ।
तेव्हा लागे सुवासिनींना शिर्डीच्या माहेराची ओढ ।। १ ।।
चला चला हो साऱ्याजणी शिर्डीस जाऊ या।
फेर धरुनी झिम्मा खेळूनी नाचू या गाऊ या।
माझ्या शिर्डीच्या साईरायाचे गुण गाऊ या ।। २ ।।
राखीपौर्णिमेला सुवासीन बांधील राखी साईरायाला।
मग देतील साईराया श्रद्धा व सबुरीची ओवाळणी।
भाळी उदी लावूनी देतील आशीर्वाद प्रेमभराने ।। ३ ।।
साईसहवासाने मशिदमाई झाली द्वारकामाई।
ईथेची बैसोनि दाविल्या कृष्णलीला त्यांनी।
म्हणूनी श्रावणमासी होते शिर्डीस गोकुळाष्टमी साजिरी ।। ४ ।।
जैसाची भेटला द्रोपदीस कृष्ण बंधुराया।
तैसाची भेटला मला साई बंधुराया ।। ५ ।।

— कु. रंजना बाळकृष्ण बोऱ्हाडे
पठ्ठे बापूराव मार्ग, बस डेपो समोर,
महाराज बिल्डींग, प. मजला,
खो.नं. ३१, मुंबई-४०००0८.

# महानिर्वाण

**(चाल : किती सांगू मी सांगू कुणाला)**

किती गावू मी महिमा साईचा
देव धरतीवर आला भक्तांचा।
संत चुडामणि आला अपुल्या जीवनी
अवतार हा दत्तप्रभूचा ॥ धृ० ॥

जरी झाली वर्षे ही पासष्ट बाबांना
निर्वाण होऊन त्यांना।
हाक तुमची ऐकेन धावून येईन
हेचि वचन माना।
हे साईचे बोल-कसे होतील फोल
आशीर्वाद असता या देवाचा
अवतार हा दत्तप्रभुचा ॥ १ ॥

भक्तिभावे आळू साईदेवाला
तनमनधन अर्पून।
मावनरूप घेऊन-केली धरती पावन
आला हा सत्कार सगुण।
अनाथांचा नाथ-हा साईनाथ
करी सांभाळ साऱ्या भक्तांचा
अवतार हा दत्तप्रभूचा ॥ २ ॥

**— श्री. बबन डी. येरम**
१/४, कल्याणजी देवजी चाळ,
चिरागनगर, घाटकोपर, मुं. ८६.

★★★★★

# नमो साई - नमो साई

तुज चरणांवरती वाहून पुष्पमाला
वंदन करितो तुजला श्री साईराया
दिनांचा तू कैवारी रे —
भक्तांचा तू भुकेला रे —
धावूनी येशी भक्तांसाठी
ऐकता भक्तांची हाक तुजसाठी

शिर्डी पुण्यभूमीवरती तुझा वास श्री साई
रात्रंदिन भक्तगण करिती "श्री साई" "नमो साई" ।।
कठीण समयी भक्तांचा आधार तू साई
धाव करिती भक्तगण तुजपाशी गुरुमाई ।।
घे आगोशात कर कृपा मज पामराला
शरण आलो तुजला देवा —
पिण्यास तुज कृपेचा प्याला ।।
दया कर ह्या पापी सेवकावर श्री साई
तुजविण कोण आता नमो साई - नमो साई ।।

— **श्री. विजयकुमार कुलकर्णी**
११७ हेलिकॉप्टर युनिट, 'एअर फोर्स',
द्वारा- ९९ ए.पी.ओ.

# साई गझल

ना मी पंडीत बुद्धीमान।
नाही मी शहाणा।।
पण हे सौख्य काय कमी आहे।
क्षणात साई दरबारी मन माझे जाय।।
याहो याहो साईमनात।
अनुभव घ्या हा जनात।।
कृपा तुमची आहे आनंत।
राहो ती नित्य आम्हावरी।।
कलीयुगी ह्या जगा तारण्या।
अवतरले भुतली साईनाथ।।
सर्व धर्म समभाव मांडीले।
बंधुत्वाचे नाते जोडिले।।
साई चरणांशी एक विनवणी।
सुटो न संगत तुझी ही जीवनी।।
देई मजला ठाव चरणी।
वर हाची द्याहो तुम्ही मजला।।
करितो विनंती साई चरणाला।
आनंद झाला माझ्या मनाला।।

— **श्री. प.वा. गाढे**
सिडको, नवीन नांदेड-४३१ ६०३.

## ।। जातो माघारी साईनाथा ।।

जातो माघारी, जातो माघारी साईनाथा
तुमचे दर्शन झाले आता ।। धृ ।।
तुमच्या कृपेने पाहिली मी
तुमच्या वास्तव्याची शिरडी
धन्य झालो आम्ही जन्माने
पाहुनी तुमच्या दर्शनाने
जातो माघारी,जातो माघारी साईनाथा ।। १ ।।
तुमच्या कृपेने वसली द्वारकामाई
तेथे पणत्या लावल्या आपुनी
धन्य झालो आम्ही ऐकूनी
तेथे पणत्या लावल्या पाण्यानी
जातो माघारी,जातो माघारी साईनाथा ।। २ ।।
तुमच्या गुरुचे आहे गुरुस्थान
तेथे वसले लिंबाचें झाड
धन्य झालो आम्ही ऐकूनी
तेथे दिवे दिसले खोदूनी
जातो माघारी,जातो माघारी साईनाथा ।। ३ ।।
तुमच्या देहाने वसली समाधी
तेथे दुःख हरेल सर्वांचे
धन्य झालो आम्ही ऐकूनी
नवसास पावेल समाधी
जातो माघारी,जातो माघारी साईनाथा ।। ४ ।।

**— श्री. सुधाकर मारुतीराव चव्हाण**
३/३५, गोवर्धनदास मॅनशन,
परेल, मुं. १२.

## शिरडीला चला

शिरडीला चला, आता शिरडीला चला
शिरडीच्या देवाला, चला भेटण्याला ।। धृ ।।
शिरडीला जाऊ। साईधामी राहू
साईंचे रूप। डोळ्याने पाहू
जैसा भाव तैसा देव, पावे भक्ताला ।। १ ।।

साईंच्या चरणी। वाहू फुलहार
साईबाबा करती। दुःख अपुले दूर
देव साई बसला। दुःख हरण्याला ॥ २ ॥
साईंची कृपा। असे निजभक्ता
धरा दृढ़ बुद्धी। असू द्याहो श्रद्धा
तेलाविना दिवे जाळी। शुभ दिवाळीला ॥ ३ ॥
धुनी पेटलेली। द्वारकामाईत
षड्रिपु राक्षस। जाळूया त्यात
औषधी उदी अहो। घ्या सोबतीला ॥ ४ ॥
चातकाने पहावी। वाट पावसाची
तैसे आम्ही देवा। आलो समाधीसी
दरबारी येऊन। जीव धन्य झाला ॥ ५ ॥

**— श्री. भुकन महारू पाटील (प्रा.शिक्षक)**
मु.पो. पडेलगांव, व्हाया मानपाडा,
प्रिमीअर कॉलनी, ता.जि. ठाणे.

# स्वामी समर्थ

टाळ सांगे चिपळीला नाच माझ्या संग
समर्थांच्या राऊळात गाऊ या अभंग ॥ धृ ॥
स्वामींच्या भाळी चंदनाचा टिळा
गळा ही विराजे रुद्राक्ष माळा
स्वामी रूपाचा आगळाच रंग
पाहूनिया आम्ही झालोय दंग ॥ १ ॥
चरण स्पर्शाने पापे ही जळती
दूराचारी विचार निघून जाती
स्वामी नामाचा लागो मज छंद
जीवनात होईल आनंदि आनंद ॥ २ ॥
नका स्वामी आता लोटू मज दूर
स्वामी चरणासी द्यावा आधार
माधव म्हणे स्वामी घडो तुमचा संग
स्वामी नाम वाचेवरी राहो अभंग ॥ ३ ॥

**— श्री. माधव शंकर पवार**
जयराम सदाशिव रोड,
ठाणे-४००६०१.

# साई माऊली

साई आमुची माऊली
साई आमुची सावली
जप जपाहो साई साई
नमन कराहो साईसी ॥ १ ॥

साई आमुचे पूज्यदैवत
साई चरणी लीन आम्ही
साई साई आमुचा धावा
सर्वस्वाचा हाच ठेवा ॥ २ ॥

साई आपुला वरदहस्त
सदा आमुच्या भाळी राहो
हीच करुणा नित्यनेमे
आळविते बाबा साई ॥ ३ ॥

**— श्री. अशोक वि. साळसकर**
९/१, भावे नगर, एम्.आय.जी.,
कुर्ला (प.), मुंबई-४०० ०७०.

★★★★★★★★★

# श्री साईबाबांची आरती

आरती ही तुम्हा हो साईबाबा ॥
सबके मालीक तुम्ही हो बाबा ॥ धृ ॥ आरती...
गुरुवार दिवशी सांज सकाळी ॥
पुजीती जन तुम्हा हो बाबा ॥ १ ॥ आरती...
गंध पुष्प धूप दिप समर्पूनी ॥
अर्पिती पुष्पमाला हो बाबा ॥ २ ॥ आरती...
कांदा भाकर, पेढे बर्फी ॥
दावीती जन तुम्हा हो बाबा ॥ ३ ॥ आरती...
तन मन अर्पूनी करितो सेवा ॥
उदी प्रसाद आम्हा हो द्यावा ॥ ४ ॥ आरती...
श्रद्धा सबुरीने घेऊनी आरती ॥
बंडाच्या हृदयी तुमचीच मूर्ती ॥ ५ ॥ आरती...

**— श्री. बी.ए. औरवाडकर**
इचलकरंजी (आंबे गल्ली),
वार्ड नं. १, घ.नं. ३७३/१ ब,
जि. कोल्हापूर.

# शिर्डी एकत्रित पाणी पुरवठा योजना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन संपन्न

अहमदनगर, दिनांक २६-१२-१९८६:- "कालव्यांच्या लगत असलेल्या खेडेगावांना कालव्यातील पाण्याचा पुरवठा पिण्यासाठी करून देण्याचा धोरणात्मक निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे." अशी घोषणा मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांनी शिर्डी येथे बोलताना केली.

१ कोटी १८ लक्ष ४८ हजार रुपये खर्च करून शिर्डी संस्थान व कनकुरी, पिंपळवाडी या गावांसाठी बांधण्यात यावयाचा पाणी पुरवठा योजनेचे भूमिपूजन दिनांक २६-१२-१९८६ रोजी मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांनी शिर्डी येथे केले. त्याप्रसंगी त्यांनी शासनाचा हा निर्णय जाहीर केला. या समारंभाचे अध्यक्षस्थानी पाटबंधारे राज्यमंत्री श्री. अण्णासाहेब म्हस्के होते.

याप्रसंगी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले, ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्याचे शासन सर्वतोपरी प्रयत्न नेटाने करीत आहे. श्री साईबाबा संस्थानात सर्व देशातून, विविध राज्यांतून लाखो भाविक दर्शनासाठी येत असतात. या भाविकांना पिण्याचे स्वच्छ पाणी मिळावे व त्याचबरोबर कनकुरी व पिंपळवाडी या गावांतील ग्रामस्थांनाही पिण्याचे आवश्यक तेवढे पाणी उपलब्ध व्हावे या उद्देशाने शासनाने ही पाणी पुरवठा योजना बांधण्याचा निर्णय घेतला आहे.

गोदावरी नदीच्या कालव्यातून ही योजना हाती घेण्यात आली असून केवळ तात्पुरत्या कालावधीसाठीच नव्हे तर बारमाही पाण्याची सोय व्हावी म्हणून परिसर अभियांत्रिकी खात्यामार्फत ही योजना कार्यान्वित करण्यात आली असल्याचेही मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांनी सांगितले.

याप्रसंगी अध्यक्षपदावरून बोलताना पाटबंधारे राज्यमंत्री श्री. अण्णासाहेब म्हस्के यांनी सांगितले, ही योजना अनेक दिवसांच्या जनतेच्या मागणीनुसार व भाविकांना योग्य ते पाणी पिण्यासाठी प्राप्त व्हावे म्हणून शासनाने मुद्दाम राबविली आहे. योजना पूर्ण करण्यासाठी कनकुरी येथे सहा ते साडेसहा हेक्टर जमीन शासनाने उपलब्ध करून दिली असल्याचेही राज्यमंत्री श्री. म्हस्के यांनी यावेळी सांगितले. यासाठी केंद्र शासनाकडूनही पैसा उपलब्ध होणार असल्याचेही श्री. म्हस्के म्हणाले.

या पाणी पुरवठा योजनेमुळे कनकुरी येथील १०५०, पिंपळवाडी येथील ३३५० व शिर्डी संस्थानचे ५० हजार दर्शनार्थी भाविकांना पाणी पुरवठा करण्यात येणार आहे.

या समारंभ प्रसंगी शिर्डी संस्थानचे विश्वस्त मंडळाचे सदस्य श्री. भिमाशंकर खांबेकर यांनी मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण, पाटबंधारे राज्यमंत्री श्री. अण्णासाहेब म्हस्के व माजी मंत्री श्री. बी. जा. खताळ यांचा फेटा बांधून व शाल देऊन सत्कार केला. श्री. भिमाशंकर खांबेकर यांचाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी फेटा बांधून सत्कार केला.



*दि. २६ डिसेंबर १९८६ रोजी शिरडी येथे पाणी पुरवठा योजनेचे भूमिपूजन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. त्या निमित्त आयोजित केलेल्या समारंभ प्रसंगी घेण्यात आलेल्या छायाचित्रात डावीकडून उजवीकडे श्री. एन.सी. मोदी, श्री. अण्णासाहेब म्हस्के, ना. श्री. शंकरराव चव्हाण, श्री. भिमाशंकर खांबेकर व श्री. रा.द. बन्ने दिसत आहेत.*

प्रारंभी श्री. खांबेकर यांनी प्रास्तविक आणि मुख्यमंत्री व राज्यमंत्री श्री. म्हस्के यांचे स्वागत केले.

समारंभास सौ. कुसूमताई चव्हाण, सौ. म्हस्के, माजी मंत्री श्री. बी. जी. खताळ, संजीवनी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष श्री. शंकरराव कोल्हे, कोपरगावचे नगराध्यक्ष श्री. पद्‌माकांत कुदळे, आयुक्त श्री. राजेंद्रसिंह, जिल्हाधिकारी श्री. नानासाहेब पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. स्वाधिन क्षत्रीय, अधिक्षक अभियंता श्री. मा.वा. तुळपुळे, कार्यकारी अभियंता श्री. दि.र. गवंठी उपस्थित होते.

**श्री साईबाबांच्या मंदिरास भेट**

मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांचे दि. २६-१२-१९८६ रोजी हेलिकॉप्टरने शिर्डी येथे आगमन झाल्यावर त्यांनी श्री साईबाबांच्या मंदिरात सपत्नीक जाऊन दर्शन घेतले. हेलिपॅडवर आ. दादा पाटील रोहमारे, जिल्हाधिकारी श्री. नानासाहेब पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. स्वाधिन क्षत्रीय आणि वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी, आदिंनी मुख्यमंत्र्यांचे पुष्पहार घालून स्वागत केले.

पैसा मिळवून आणि कुटुंबियांचे पोषण करून गतानुगतिकपणे कसेतरी अटाटीचे आयुष्य कंठीत राहून एक दिवस मरण्यासाठी माझा जन्म झालेला नाही. माझ्या जीवनाचे उद्दिष्ट महान आहे - अखंड सच्चिदानंदाचा लाभच माझे लक्ष्य होय.

— स्वामी विवेकानंद

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
## श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. क्र. | पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकींग व पोस्टेज |
|---|---|---|---|---|
| १. | श्री साई सत्‌चरित | मराठी | ३१-०० | ६-५० |
| २. | —''— | इंग्रजी | १४-५० | ५-२५ |
| ३. | —''— | हिंदी | ८-५० | ५-२५ |
| ४. | —''— | गुजराथी | १९-०० | ५-२५ |
| ५. | —''— | कन्नड | १०-०० | ४-०० |
| ६. | —''— | तेलगु | — | — |
| ७. | —''— | तामीळ | — | — |
| ८. | —''— | सिंधी | २२-०० | ४-५० |
| ९. | श्री साई सत्‌चरित पोथी | गुजराथी | ३१-०० | ६-५० |
| १०. | श्री साई लिलामृत | मराठी | — | — |
| ११. | —''— | हिंदी | १०-५० | ४-०० |
| १२. | —''— | गुजराथी | ६-६५ | ४-०० |
| १३. | अवतार व कार्य | मराठी | ६-०० | ४-०० |
| १४. | स्तवन मंजिरी | मराठी | ०-६५ | ३-५० |
| १५. | —''— | हिंदी | १-०० | ३-५० |
| १६. | —''— | गुजराथी | — | — |
| १७. | सगुणोपासना (आरती) | मराठी | ०-७० | ३-५० |
| १८. | —''— | हिंदी | १-२५ | ३-५० |
| १९. | —''— | गुजराथी | ०-८० | ३-५० |
| २०. | —''— | तेलगु | — | — |
| २१. | —''— | सिंधी | १-२५ | ३-५० |
| २२. | दासगणूकृत ४ अध्याय | मराठी | १-८५ | ३-५० |
| २३. | सचित्र साईबाबा | मराठी/इंग्रजी | — | — |
| २४. | मुलांचे साईबाबा | मराठी | १-६५ | ३-५० |
| २५. | —''— | इंग्रजी | १-६५ | ३-५० |
| २६. | —''— | हिंदी | १-६५ | ३-५० |
| २७. | —''— | गुजराथी | १-६५ | ३-५० |
| २८. | —''— | तेलगु | २-०० | ३-५० |
| २९. | रुद्राध्याय (अ. ११ वा) | मराठी | ०-८० | ३-५० |
| ३०. | मार्गदर्शिका (शिर्डी गाईड) | मराठी | १-५० | ३-५० |
| ३१. | —''— | इंग्रजी | १-५० | ३-५० |
| ३२. | —''— | गुजराथी | १-५० | ३-५० |
| ३३. | साई दि सुपरमॅन | इंग्रजी | ७-२५ | ४-०० |
| ३४. | साईबाबा ऑफ शिर्डी (भरुचा) | इंग्रजी | ६-५० | ४-०० |
| ३५. | साईबाबा ऑफ शिर्डी (प्रधान) | इंग्रजी | ३-०० | ४-०० |
| ३६. | अष्टोत्तर शत नामावली | मराठी | १-०० | ३-५० |
| ३७. | रघुनाथ सावित्री भजनमाला | मराठी | १५-२५ | ४-५० |

Regd: No. MH/BYE/26
LICENCE No. 19
Licence to Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14.

# श्री साईबाबा संस्थान शिरडी

## फोटोंची यादी

| अनु. क्र. | फोटोचे नांव | साईज | किंमत | पोस्टेज व पॅकिंग |
|---|---|---|---|---|
| १. | द्वारकामाई फोटो (प्लॅस्टिक कोटेड) | १७" x २२" | ३-५० | ३-५० |
| २. | —"— | १४" x २०" | १-५० | ३-५० |
| ३. | —"— | ७" x १०" | ०-६० | ३-५० |
| ४. | दगडावर बसलेले साईबाबा (काळा/पांढरा) | १४" x २०" | ०-८० | ३-५० |
| ५. | मूर्ती फोटो | १४" x २०" | १-५० | ३-५० |
| ६. | —"— | १०" x १४" | ०-९० | ३-५० |
| ७. | —"— | ७" x १०" | ०-६० | ३-५० |

**पुस्तकं आणि छायाचित्रे मिळण्याचे ठिकाण :—**

१. कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान,
पो. शिरडी, ता. कोपरगांव, जि.- अहमदनगर.

२. साईनिकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर मार्ग,
दादर, मुंबई-४०० ०१४.

मुद्रक : श्री. एम.डी. राजन, गीता ऑफसेट, बी - २३ रॉयल इंडस्ट्रियल इस्टेट,
नायगांव क्रॉस रोड, वडाळा, मुंबई - ४०० ०३१.
**संपादक व प्रकाशक :** श्री. रा.द. बन्ने, साई निकेतन,
डॉ. आंबेडकर मार्ग, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०४ बी., दादर, मुंबई - ४०० ०१४.